cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–१४ | बुधवार दि.२४ एप्रिल २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने– ६ | किंमत ३ रूपये

संपादकीय

निवडणूक आयोगाकडे उत्तर असेल का?

शिवसेना ठाकरे गटाच्या 'शंखनाद होऊ दे, रणदुंदुभी वाजू दे, नादघोष गर्जू दे विशाल' या मशाल गीतात फक्त एकदा 'जय भवानी' व 'हिंदू' हा शब्द वापरण्यात आला आहे त्यावरून आयोगाने ठाकरे गटाला नोटीस बजावली आहे. आता उद्धव ठाकरे यांनी हे शब्द काढणार नाही, अशी भूमिका घेत उलट आयोगालाच आव्हान दिले आहे. प्रसंगी या प्रकरणी आम्ही न्यायालयातही जाऊ, असा इशाराही उद्धव ठाकरेंनी दिला आहे. शिवसेना ठाकरे गटाच्या मशाल गीतातील 'जय भवानी' व 'हिंदू' हा शब्द कोणत्याही परिस्थितीत वगळणार नाही. 'जय भवानी, जय शिवाजी' ही आमची घोषणा आहे.

केजरीवाल यांना देण्यात आला इन्सुलिनचा डोस

नवी दिल्ली : दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या रक्तातील साखर वाढल्यानंतर त्यांना इन्सुलिन देण्यात आले आहे. तिहार तुरुंगाच्या अधिकाऱ्यांनी मंगळवारी ही माहिती दिली. ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस (एम्स) च्या डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार, केजरीवाल यांना सोमवारी संध्याकाळी कमी डोसचे इन्सुलिनचे दोन युनिट देण्यात आले, त्यानंतर त्यांची साखरेची पातळी २१७ वर आली आहे, असे तिहारच्या एका अधिकाऱ्याने सांगितले.एम्सच्या तज्ज्ञ डॉक्टरांनी २० एप्रिल रोजी मुख्यमंत्र्यांसोबत व्हीडीओ कॉन्फरन्स दरम्यान तिहारच्या डॉक्टरांना सल्ला दिला होता की केजरीवाल यांची रक्तातील साखरेची पातळी एका विशिष्ट पातळीपेक्षा जास्त असल्यास त्यांना इन्सुलिन दिले जाऊ शकते.

सरकारच्या निर्यात बंदीची शेतकऱ्यांना झळ

» आर्थिक वर्षात ८.८ टक्क्यांनी घटली शेतमालाची निर्यात

पुणे । प्रतिनिधी

देशातील शेतमालाची निर्यात एप्रिल ते फेब्रुवारी २०२३–२४ या आर्थिक वर्षात ८.८ टक्क्यांनी घसरून ४३.७ अब्ज डॉलरवर आली आहे. केंद्र सरकारच्या निर्यातबंदीच्या धोरणांसोबतच लाल समुद्रातील संघर्ष आणि रशिया–युक्रेन युद्धाचा शेतमाल निर्यातीतील फटका बसला. निवडणुका डोळ्यासमोर ठेवून केंद्र सरकारने शेतकरीविरोधी निर्णयांचा सपाटा लावलेला आहे. तांदूळ, गहू, साखर आणि कांद्याच्या निर्यातीवर निर्बंध घातलेली आहेत. त्याचा परिणाम शेतमालाच्या निर्यातीवर झाला असून, त्याचीच झळ शेतकऱ्यांना बसली आहे.

वाणिज्य मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार, एप्रिल ते फेब्रुवारी २०२२–२३ या आर्थिक वर्षात शेतमालाची निर्यात ४७.९ अब्ज डॉलरवर पोहचली होती. परंतु जागतिक स्तरावरील तणावाची स्थिती आणि केंद्र सरकारच्या निर्यातबंदीच्या धोरणांमुळे निर्यातीचा टक्का घसरला आहे. त्यामुळे कृषी क्षेत्राचा जीडीपी घटला आहे. २०२३–२४ च्या आर्थिक वर्षात कृषी क्षेत्राचा जीडीपी ०.७ टक्क्यांनी वाढ दर्शवतो. परंतु २०२२–२३ च्या आर्थिक वर्षात कृषी क्षेत्राच्या जीडीपीत ४.७ टक्क्यांनी वाढ झाली होती. म्हणजेच गेल्या आर्थिक वर्षात निर्यातीत घसरण झाली आहे. त्याचा शेतकऱ्यांना मोठा फटका बसतो आहे. केंद्र सरकारकडून शेतमालाच्या निर्यातीला प्रोत्साहन दिले जात असल्याचा दावा वाणिज्य मंत्रालयाकडून सातत्याने केला जातो. परंतु प्रत्यक्षात मात्र स्थिती उलट आहे. अपेडाच्या माध्यमातून ७१९ शेतमालाची ◀◀ पान २ वर

सरकारने शेतकऱ्यांच्या ताटात माती कालवली

लोकसभा निवडणुकांच्या काळात ग्राहकांच्या खिशाला झळ बसू नये, यासाठी मागील दोन वर्षांपासून केंद्र सरकारने शेतमालाच्या निर्यातीवर निर्बंध घालायला सुरुवात केली होती. गहू, तांदूळ, साखर आणि कांदा निर्यातीवर निर्बंध घातल्यामुळे शेतकऱ्यांना थेट फटका बसला. शेतकऱ्यांकडून निर्यात निर्बंध उठवण्यासाठी मागणी करण्यात येत होती. परंतु केंद्र सरकारने ग्राहक हितासाठी शेतकऱ्यांच्या ताटात माती कालवली. गहू, तांदूळ, साखर आणि कांदा निर्यातबंदीमुळे गेल्या आर्थिक वर्षात ५ ते ६ अब्ज डॉलरचा फटका बसल्याचे जाणकार सांगतात.

पतंजलीने मागितली ६७ वर्तमानपत्रांमधून जाहीर माफी

सर्वोच्च न्यायालय म्हणाले, आणखी व्याप्ती वाढवा

नवी दिल्ली । वृतसंस्था

पतंजली फसव्या जाहिरात प्रकरणी मंगळवारी सर्वोच्च न्यायालयात सुनावणी पार पडली. पतंजलीने सुप्रीम कोर्टाला सांगितले की, त्यांनी ६७ वर्तमानपत्रांमध्ये जाहीर माफी मागितली आहे. येत्या काळात आणखी मोठ्या आकाराची जाहिरात प्रसिद्ध होईल, असे पतंजलीकडून न्यायालयामध्ये सांगण्यात आले आहे. सुप्रीम कोर्टाने या सुनावणीची व्याप्ती वाढवली आहे.

हे प्रकरण फक्त एका संस्थेपुरते म्हणजे पतंजलीपुरते मर्यादित राहणार नाही, अशी महत्त्वपूर्ण टिप्पणी यावेळी सर्वोच्च न्यायालयाने केली आहे. दिशाभूल करणाऱ्या जाहिरातींद्वारे उत्पादनांची विक्री करून लोकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या इतर कंपन्यांवर काय कारवाई केली? असा न्यायालयाने केंद्र सरकारला सवाल केला आहे.

कोर्टाने या प्रकरणात प्रत्येक राज्याच्या औषध परवाना प्राधिकरणाला पक्षकार बनवले आहे. पतंजली (बाबा रामदेव आणि आचार्य बाळकृष्ण) प्रकरणाची ३० एप्रिलला सुनावणी होणार आहे. नव्याने व्याप्ती वाढवलेल्या प्रकरणाची ७ मे रोजी सुनावणी होणार आहे. मागील सुनावणीमध्ये बाबा रामदेव आणि आचार्य बाळकृष्ण यांनी सर्वोच्च न्यायालयात माफीनामा सादर केला होता. मात्र, न्यायालयाने त्यावर कडक ताशेरे ओढत तो माफीनामा स्वीकारला नव्हता. न्यायमूर्ती हिमा कोहली आणि न्यायमूर्ती अमानतुल्ला यांच्या खंडपीठासमोर झालेल्या सुनावणीत खंडपीठाने कडक ताशेरे ओढले होते. ही माफी केवळ समाधानासाठी असल्याचे ◀◀ पान २ वर

पंकजाताईंच्या महाविजयासाठी महायुतीचे आज महाशक्तीप्रदर्शन

साडेचार वर्षानंतर कार्यकर्त्यांमध्ये संचारणार नवचैतन्य

■ पंकजाताई मुंडे जन आशीर्वाद रॅलीने दाखल करणार उमेदवारी अर्ज

रॅली व सभेला मोठ्या संख्येने उपस्थित रहा– राजेंद्र मस्के

बीड । प्रतिनिधी

पंकजाताई मुंडे यांचा बालेकिल्ला असूनही परळीतून पराभव झाल्याने त्यांनी राजकारणात सक्रीय न राहणे पसंत केले. त्यामुळे बीड भाजपातही एक प्रकारे मरगळ आली होती. पंकजाताई मुंडे या आपला उमेदवारी अर्ज पालकमंत्री धनंजय मुंडे व इतर नेत्यांच्या समवेत बुधवारी दुपारी २ वाजता दाखल करणार असून यावेळी बीडमध्ये मोठे शक्तीप्रदर्शन केले जाणार आहे. त्यामुळे तब्बल साडेचार वर्षानंतर बीडच्या भाजपात नवचैतन्य निर्माण होणार आहे. अर्ज भरल्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करुन मोटारसायकल रॅली काढण्यात येणार असून माने कॉम्प्लेक्स, बीड येथे साय. ६ वा. जाहीर सभा होणार आहे. या वेळी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन भाजपा जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी केले आहे.

गोपीनाथ मुंडे यांनी बीड जिल्ह्यावर व जिल्ह्याने त्यांच्यावर अफाट प्रेम केले. त्यांच्यानंतर पंकजाताई मुंडे यांच्यावरही जिल्ह्याने जीव लावला. त्यांनीही पालकमंत्री असताना बीड जिल्ह्यासाठी मोठा निधी आणला. मात्र परळीतून त्यांच्या पराभव झाल्यावर त्यांनी बीडकडे काही प्रमाणात का होईना दुर्लक्ष केले. या काळात बीड जिल्ह्यातील कार्यकर्त्यांमध्येही मरगळ आली होती. साडेचार वर्षानंतर आपल्या नेत्यासाठी आज बुधवारी जिल्हाच नव्हे तर राज्यातून मुंडे समर्थक बीडला येणार आहेत. उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या निमित्ताने का होईना कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य संचारणार आहे. लोकनेत्या पंकजाताई मुंडे यांनी उमेदवारी ◀◀ पान २ वर

यांची असणार सभेला उपस्थिती

खा. डॉ. प्रितमताई मुंडे, आ. सुरेश धस, आ. प्रकाश सोळंके, आ. बाळासाहेब आजबे, आ. लक्ष्मण पवार, आ. नमिताताई मुंदडा, आ. संजय दौंड, माजी आ. अमरसिंह पंडित, भीमराव धोंडे, भाजप जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, राष्ट्रवादी काँग्रेस जिल्हाध्यक्ष राजेश्वर चव्हाण, शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल जगताप जिल्हाप्रमुख, सचिन मुळूक, कुंडलिक खांडे, पप्पुजी कागदे, आण्णासाहेब मतकर, प्रकाश महाजन, मनसे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मोटे, सुमंत धस, श्रीराम बादाडे, तुरुकमारे सर, रमेश आडसकर, मोहन जगताप, कल्याण आखाडे, योगेश क्षीरसागर, ॲड. वाल्मिक निकाळजे, सलीम जहागीर, फारूक पटेल, पि.टी. चव्हाण आदींसह विविध क्षेत्रातील मान्यवरासह पदाधिकारी व कार्यकर्ते रॅली व जाहीर सभेत सहभागी होणार आहेत.

राज्यभरातून येणार समर्थक

पंकजाताई आपला उमेदवारी अर्ज भरण्यासाठी बुधवारी बीडला येत असल्याने त्यांचे राज्यभरातून समर्थकही येत आहेत. त्यामुळे शहरात मोठी गर्दी होण्याची शक्यता आहे.

परळी, दिंद्रुड परिसरात अवकाळीचा फटका

उन्हाळी पिकांसह फळबागांचे अतोनात नुकसान ; वादळी वाऱ्यासह गारांच्या माऱ्याने झाडे पडली

परळी / दिंद्रुड/प्रतिनिधी

जिल्ह्यामध्ये गेल्या आठ दिवसांपासून अवकाळी पावसाने धुमाकूळ घातला आहे. जिल्ह्याच्या विविध भागात वादळी वाऱ्यांसह पाऊस पडत आहे. मंगळवार दि.२३ रोजी संध्याकाळच्या सुमारास परळी आणि दिंद्रुड परिसरात आलेल्या अवकाळीने उन्हाळी पिकांसह फळबागांचे मोठे नुकसान झाले आहे. यावेळी जोराचे वादळ आणि सोबत गारपीट आल्याने रस्त्यावरील झाडे उन्मळून पडली आहेत. गेल्या काही दिवसांपासून अवकाळीत झालेल्या नुकसानीने शेतकरी हतबल झाले असून, त्यांना ◀◀ पान २ वर

आजच्या विराट रॅलीमध्ये हजारोंच्या संख्येने सहभागी व्हा–ॲड. सर्जेराव तांदळे

बीड । प्रतिनिधी

भाजपाच्या राष्ट्रीय नेत्या पंकजाताई मुंडे यांचा उमेदवारी अर्ज बुधवारी (दि.२४) महायुतीचे नेते आणि कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत भरण्यात येणार आहे. हजारो कार्यकर्त्यांच्या विराट रॅली काढून लोकसभा निवडणुकीचा उमेदवारी अर्ज भरण्यासाठी पंकजाताई मुंडे ह्या जिल्हाधिकारी कार्यालयात येणार आहेत. तरी भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी, मनसे, रिपाइं, रासपचे पदाधिकारी, कार्यकर्ते यांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन भाजपाचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य तथा बीड जिल्हा सरचिटणीस ॲड. सर्जेराव तांदळे यांनी केले आहे.



भाजपा नेते सर्जेराव तांदळे म्हणाले, पंकजाताई मुंडे ह्या स्व. लोकनेते मुंडे साहेब आणि प्रीतमताई यांच्याप्रमाणेच विक्रमी मतांनी विजयी होत संसदेत जाणार आहेत. राज्याच्या ग्रामविकास मंत्री असताना त्यांनी बीड जिल्ह्यात २० हजार कोटीपेक्षा अधिकचा निधी खेचून आणला. पुर्वी जिल्ह्यात केवळ दोन राष्ट्रीय महामार्ग होते. दोन्ही ताईंनी मिळून नविन ११ राष्ट्रीय महामार्ग मंजूर करून आणले अन्? ते पुर्णही केले. मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेच्या माध्यमातून ◀◀ पान २ वर

बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.२२ एप्रिल २०२३

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

	किमान	कमाल	सरासरी
गहू : ५.५० क्विंटल			
	२,२०१	२,२९०	२,२४५
ज्वारी/हायब्रिड : ५९.०० क्विंटल			
	१,७००	७,७०१	२,६६१
मूग : ०.५० क्विंटल			
	९,८५०	९,८५०	९,८५०
तूर : ८.५० क्विंटल			
	८,७००	१०,८००	१०,०२७
उडीद : १.५० क्विंटल			
	५,०००	६,५०१	५,७५०
बाजरी: ३९.०० क्विंटल			
	२,४००	२,७००	२,५३५
चिंचोका/लोकल: ८.०० क्विंटल			
	२,४००	२,४००	२,४००
सोयाबीन: २७३.०० क्विंटल			
	४,५११	४,६२५	४,५८३
हरभरा: ११.०० क्विंटल			
	४,१००	५,६७२	५,१५१

सबका साथ सबका विकास फेल ठरतंय का?

» नरेंद्र मोदींकडून थेट हिंदुत्वाचा आधार

बीड: सबका साथ सबका विकास हा नारा देत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशांमध्ये दोन वेळा सत्ता मिळवली आणि चालवली सुद्धा. प्रखर हिंदुत्ववादी नेते म्हणून नरेंद्र मोदी यांच्याकडे पाहिले जात होते मात्र गेल्या पाच वर्षात त्यांनी विशेषतः सबका साथ सबका विकास हा नारा देत आपले सरकार व स्वतःचे नेतृत्व सर्वव्यापी व सर्व धर्मीय असल्याचे ठासून सांगण्याचा प्रयत्न केला. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीतील पहिल्या टप्प्यापर्यंत प्रचारातील सबका साथ सबका विकास हाच मुद्दा मुख्य होता. अचानक नरेंद्र मोदी यांनी प्रचाराच्या मुद्द्याच्या बाबतीत ट्रॅक चेंज करून थेट हिंदुत्वाचा आधार घेतला. त्यासाठी त्यांना तब्बल अठरा वर्षांपूर्वीच्या तत्कालीन पंतप्रधान डॉक्टर मनमोहन सिंग यांच्या एका वक्तव्याचा हवाला द्यावा लागला. त्यावेळी मनमोहन सिंग यांनी देशातील संपत्तीवर मुस्लिम अल्पसंख्यांकांचा पहिला अधिकार असल्याचे म्हटले होते. सिंग यांच्या वक्तव्यानंतर पंतप्रधान कार्यालयाने याबाबत खुलासा सुद्धा केला होता. तब्बल १८ वर्षात या विषयावर भाजप व नरेंद्र मोदी यांना कधीच बोलावेसे वाटले नाही. मात्र अचानक मोदी यांना हिंदुत्वाची आठवण झाली आणि त्यांनी जोरदार हल्लाबोल केला. काँग्रेसवर

टीका करताना त्यांनी देशातील महिलांचे मंगळसूत्र सुद्धा काँग्रेस सरकार आल्यावर सुरक्षित राहणार नाही. नक्षलवादी विचार काँग्रेसवर प्रभावी झाला आहे, अशा स्वरूपात जोरदार टीका केली. गेल्या काही वर्षांमध्ये सातत्याने विकासाच्या मुद्द्यावर बोलणारे नरेंद्र मोदी अचानक हिंदुत्वावर का बोलायला लागले? अठरा वर्षांपूर्वीच्या तत्कालीन पंतप्रधान मनमोहन सिंग यांच्या वक्तव्याचा त्यांना लोकसभा निवडणुकीतच आधार का घ्यावासा वाटला? सबका साथ सबका विकास या मुद्द्यावर निवडणूक नाही हे त्यांच्या लक्षात आले का? या लोकसभा निवडणुकीत काँग्रेस कडून सुद्धा मुस्लिम कार्डचा वापर ◀◀ पान २ वर

cmyk

अग्रलेख

निवडणूक आयोगाकडे उत्तर असेल का?

शिवसेना ठाकरे गटाच्या 'शंखनाद होऊ दे, रणदुंदुभी वाजू दे, नादघोष गर्जू दे विशाल' या मशाल गीतात फक्त एकदा 'जय भवानी' व 'हिंदू' हा शब्द वापरण्यात आला आहे त्यावरून आयोगाने ठाकरे गटाला नोटीस बजावली आहे. आता उद्धव ठाकरे यांनी हे शब्द काढणार नाही, अशी भूमिका घेत उलट आयोगालाच आव्हान दिले आहे. प्रसंगी या प्रकरणी आम्ही न्यायालयातही जाऊ, असा इशाराही उद्धव ठाकरेंनी दिला आहे. शिवसेना ठाकरे गटाच्या मशाल गीतातील 'जय भवानी' व 'हिंदू' हा शब्द कोणत्याही परिस्थितीत वगळणार नाही. 'जय भवानी, जय शिवाजी' ही आमची घोषणा आहे. आज 'जय भवानी' हा शब्द काढायला सांगताय उद्या 'जय शिवाजी' हा शब्द काढायला सांगाल. ते अजिबात खपवून घेणार नाही, असे शिवसेना ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी निवडणूक आयोगाला ठणकावले. कारवाई करायची असेल तर आधी 'बजरंग बली'च्या नावाने मते मागणाऱ्या पंतप्रधान मोदींवर करा, रामलल्लाचे मोफत दर्शन देण्याचे आश्वासन देणाऱ्या केंद्रीय गृहमंत्री अमित शहांवर करा, असे आव्हान उद्धव ठाकरे यांनी आयोगाला दिले आहे. शिवसेनेत झालेल्या बंडानंतर निवडणूक आयोगाने शिवसेना ठाकरे गटाला 'धगधगती मशाल' हे निवडणूक चिन्ह दिले आहे. त्यावर आधारित पक्षाने ६० सेकंदाचे 'शंखनाद होऊ दे' हे प्रचारगीत तयार केले आहे.

`मशाल गीतामध्ये 'जय भवानी' व 'हिंदू' शब्द असल्याने निवडणूक आयोगाने उद्धव ठाकरे यांना नोटीस बजावली आहे. धर्माच्या आधारावर प्रचार असा आक्षेप या संदर्भात घेण्यात आला आहे. त्यावर उद्धव ठाकरे यांनी 'मातोश्री' निवासस्थानी घेतलेल्या पत्रकार परिषदेत उलट निवडणूक आयोगालाच आव्हान दिले. या वेळी उद्धव ठाकरे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांच्या सभांमधील भाषणांची क्लिप पत्रकारांना ऐकवली. मध्य प्रदेश निवडणुकीच्या वेळी 'बजरंग बली'च्या नावावर मत द्या, असे पंतप्रधान मोदी म्हणाले होते. या शिवाय आम्हाला मत दिल्यास रामलल्लाचे मोफत दर्शन, असे अमित शहा जाहीर सभेत बोलले होते. निवडणुकीत धर्माच्या मुद्यावर प्रचार करणे नियमांच्या विरुद्ध आहे. असे असताना मोदी आणि शहा हिंदुत्वाचा प्रचार करीत आहेत. त्याची तक्रार पक्षाने निवडणूक आयोगाकडे केली होती मात्र, त्याबाबत अद्याप कोणतेही उत्तर आलेले नाही, असे उद्धव ठाकरे म्हणाले. धर्माच्या नावाखाली प्रचार केल्या प्रकरणी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांना निवडणूक आयोगाने ६ वर्षांसाठी मतदान करण्यावर तसेच निवडणूक लढविण्यावर बंदी घातली होती, याची आठवणही उद्धव ठाकरे यांनी करून दिली. आम्ही मोदी-शहा यांच्याबाबत तक्रार करूनही काहीही उत्तर आले नाही. यावर निवडणूक आयोगाने उत्तर न दिल्यास नियम बदलला आहे, असे आम्ही समजू आणि आम्हीदेखील असा प्रचार केला तर तुम्हाला कारवाई करता येणार नाही, असे उद्धव ठाकरे म्हणाले. ठाकरेंच्या या युक्तिवादाला खोडून काढणे आयोगाला जमणार नाही हे उघड आहे. 'जय भवानी, जय शिवाजी' ही घोषणा महाराष्ट्रातील जनतेच्या मनामनात आहे. आम्ही गाण्यातील 'जय भवानी' शब्द काढणार नाही. निवडणूक आयोगाने महाराष्ट्राच्या कुलदेवतेचा अपमान केल्याचा आरोप केल्यास आयोगाकडे याचे उत्तर आहे काय? असा सवालही उद्धव ठाकरे यांनी केला. मोदी-शहा देवाच्या नावावर मते मागतात त्यांच्यावर कारवाई का नाही? या बिनतोड सवालाचे उत्तर निवडणूक आयोगाकडे खचितच नसणार! आयोगाचे नियम सर्वांसाठी समान असायला हवेत; परंतु तसे होताना दिसत नाही. राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित पवार हे अनेकदा अत्यंत वादग्रस्त विधाने करतात आणि नंतर माफीही मागतात.

सद्या सभांमधून ते अप्रत्यक्षपणे धमकावताना दिसले. मी पाहिजे तेवढा निधी देतो; पण मशिनमध्ये माझ्यासाठी कचाकचा बटण दाबा म्हणजे निधी द्यायला मला बरे वाटेल नाही तर मी हात आखडता घेईन, या त्यांच्या वक्तव्याने राजकीय क्षेत्रात खळबळ माजली; परंतु निवडणूक आयोगाला ती दिसली नाही! उबाठा गटाचे नेते संजय राऊत यांनी अजित दादांच्या वक्तव्यावर कठोर टीका करताना म्हटले की, अजित पवार स्वत: व्यापारी आहेत त्यामुळे ते सौदा करणारच. आपला देशच एक व्यापारी चालवतो आहे त्याने ठिकठिकाणी असे एजंट नेमले आहेत. शिवसेनेत उभी फूट पडल्यानंतर उद्धव ठाकरे यांची निशाणी पण गेली. त्यांना धनुष्यबाण सोडून मशाल हाती घ्यावी लागली. आता मशाल गीतावरून निवडणूक आयोगाने त्यांना कोंडीत पकडले आहे. मशाल गीतातील 'जय भवानी' आणि 'हिंदू' शब्दावर निवडणूक आयोगाने आक्षेप घेतला आहे. त्यावर उद्धव ठाकरे यांनी निवडणूक आयोगाला थेट आव्हान दिले आहे. यावर आयोग काय उत्तर देणार आणि कोणमी भुमिका घेणार याकडे लक्ष लागले आहे.

पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारार्थ डॉ.योगेश क्षीरसागरांनी बीड मतदारसंघ पिंजून काढला

जिल्हा परिषद गटनिहाय दौरे सुरूच; रायमोहा येथे बैठकीस उत्स्फूर्त प्रतिसाद

बीड । प्रतिनिधी

महायुतीच्या बीड लोकसभेच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारार्थ राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी अक्षरश: बीड विधानसभा मतदारसंघ पिंजून काढला आहे. त्यांचे जिल्हा परिषद गटनिहाय दौरे सुरूच असून शिरूर कासार तालुक्यातील रायमोहा येथे जिल्हा परिषद गटातील प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या बैठकीस उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

यावेळी बोलताना डॉ.योगेश क्षीरसागर म्हणाले, लोकसभा निवडणुकीनिमित्त विकासाभिमुख नेतृत्व असलेल्या पंकजाताई मुंडे यांना मत देण्याची संधी सर्वांना मिळाली आहे. या संधीचे सोने करण्यासाठी आपल्या बूथवर शंभर टक्के मतदान करून घ्या. पंकजाताईंनी केलेली विकासकामे प्रत्येक बूथपर्यंत पोहोचवा. आपल्या बूथवर पंकजाताईंना मताधिक्य मिळेल, आपल्या जिल्ह्याच्या लौकिकाला शोभेल असे मताधिक्य पंकजाताईंना मिळेल यासाठी पूर्ण ताकदीने कामाला लागा, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी डॉ.सारिकाताई क्षीरसागर, वसंत सानप, पंढरीनाथ उगले, भगवानराव सानप, मधुकर भोसले, माऊली मार्कड, जालू सानप, ॲड.प्रल्हाद ढाकणे, बाबासाहेब सानप, सखाराम नागरगोजे, अशोक ढाकणे, भीमराव ढाकणे, उमेश खेडकर, गोपाल सोनवणे, मंगेश सानप, अनिकेत सानप, यश येवले, अशोकराव गायकवाड, तुकाराम धनगुडे, मीनल उगले, बाळासाहेब भस्मारे, दिलीप जायभाये, अनिल राख, रोहिन शेख, अशोक इंगळे, शोभा सरवदे, राऊत यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेससह मित्र पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. बीड विधानसभा मतदारसंघात शहर आणि ग्रामीण भागात डॉ.योगेश क्षीरसागर, डॉ. सारिकाताई क्षीरसागर यांचे संघटन मजबूत बनत आहे. 'बूथ तिथे युथ' असे चित्र असून त्यांच्याकडे शिक्षण, सहकारासह इतर खाजगी संस्थांचे जाळे असून त्याच्याकडे हक्काचे मोठे मतदान आहे. दरम्यान, सध्याचा त्यांची प्रभावी प्रचार पाहता डॉ.क्षीरसागर दाम्पत्यामुळे पंकजाताईंना बीड मतदारसंघातून मोठी लीड मिळणार आहे. पंकजाताई मुंडे यांचा उमेदवारी अर्ज आज (दि.२४) महायुतीचे नेते आणि कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत दाखल करण्यात येणार आहे. हजारो कार्यकर्त्यांची विराट रॅली काढून लोकसभा निवडणुकीचा उमेदवारी अर्ज भरण्यासाठी पंकजाताई मुंडे या जिल्हाधिकारी कार्यालयात येणार आहेत. तरी राष्ट्रवादी काँग्रेससह मित्र पक्षाच्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर, डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी केले आहे.

सत्ताधारी पक्षाकडून वंचितच्या उमेदवारांना धमकावण्याचा प्रयत्न – वंचितचा आरोप

मुंबई । प्रतिनिधी

वंचित बहुजन आघाडीचे जळगावचे उमेदवार प्रफुल्ल लोढा यांनी काही दिवसांपूर्वी उमेदवारी अर्ज मागे घेतला आणि त्यापाठोपाठ सोलापूरचे उमेदवार राहुल गायकवाड यांनीही उमेदवारी अर्ज मागे घेतला आहे. सत्ताधारी पक्षांनी धमकावल्याने अर्ज मागे घेतल्याचा आरोप वंचित बहुजन आघाडीचे मुख्य प्रवक्ते आणि राज्य उपाध्यक्ष सिद्धार्थ मोकळे यांनी व्हिडिओच्या माध्यमातून केला आहे.

वंचित बहुजन आघाडीच्या वतीने महाराष्ट्रातील अनेक मतदार संघामध्ये उमेदवार उतरवण्यात येत आहेत. मात्र, आमच्या असे लक्षात आले की, त्या उमेदवारांना सत्ताधारी पक्षांकडून धमकावण्याचा प्रयत्न होत आहे, असा आरोप करण्यात आला आहे. सिध्दार्थ मोकळे म्हणाले की, जळगाव येथे प्रफुल्ल लोढा यांना उमेदवारी देण्यात आली होती. मात्र, सत्ताधारी पक्षातील नेत्यांना ते रूचलेले दिसत नाही. हा जैन समाजाचा व्यक्ती वंचित बहुजन आघाडीच्या तिकिटावर आमच्या मतदार संघात कसा काय उभा राहतो? असा सवाल उपस्थित करत त्या उमेदवाराला त्रास देण्याचा प्रयत्न झाला, त्याला धमकावण्यात आले, त्यांच्या कुटुंबांला धमकावण्यात आले. त्याचे व्यवहार रोखण्याचे प्रयत्न झाला आणि दबाव टाकून त्या उमेदवाराला उमेदवारी मागे घ्यायला लावली आहे. उमेदवाराने पक्षाशी संपर्क साधला आणि घटनाक्रम सांगितला. काही गोष्टी आमच्या हातातल्या होत्या, त्या आम्ही रोखू शकत होतो, मात्र, काही गोष्टी आमच्या हातात नव्हत्या त्या कुटुंबांना नाहक त्रास नको हा विचार करून त्यांनी उमेदवारी मागे घेण्याचा निर्णय घेतला. त्याला पक्षाने संमती दिली आणि त्या ठिकाणी दुसरा उमेदवार आम्ही उतरवला असल्याचे सांगितले. पुढे बोलताना सिध्दार्थ मोकळे म्हणाले की, सोलापूर येथे सुद्धा आमच्या उमेदवाराने पक्षाशी संपर्क न साधता थेट उमेदवारी अर्ज मागे घेतला. तिथली माहिती काढल्यावर आमच्या लक्षात आले की, तिथे सुद्धा सत्ताधारी पक्षाने आमच्या उमेदवाराला धमकावले आहे आणि त्या दबावाला बळी पडून उमेदवाराने अर्ज मागे घेतल्याचे सांगितले. अशा पद्धतीने आमच्या उमेदवाराला धमकावून, अर्ज मागे घ्यायला लावून गलिच्छ राजकारण जर इथला सत्ताधारी पक्ष करत असेल, तर त्याचा आम्ही तीव्र निषेध व्यक्त करतो आणि त्यांना सांगू इच्छितो की, वंचित बहुजन आघाडी हा लढाऊ बाण्याचा पक्ष आहे, प्रामाणिकपणे जनतेचे प्रश्न घेऊन लढणारा पक्ष आहे अशा कितीही धमक्या दिल्या, धमकावून उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा प्रयत्न केला, तरी सुद्धा वंचित बहुजन आघाडी थांबणार नाही आणि इथली आरएसएस, भाजपाची सत्ता उलथवून टाकल्याशिवाय राहणार नाही असा इशाराही यावेळी त्यांनी दिला.

बोंबला! राज्याच्या शालेय शिक्षण मंत्रालयाच्या खात्यातून लाखो रुपये चोरीला

बनावट स्टॅम्प, बनावट चेक आणि बनावट स्वाक्षरीचा वापर, शासनाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह

मुंबई । प्रतिनिधी

सरकार प्रचारांच्या फेरीला गुंतले असताना राज्याच्या शालेय शिक्षण विभागाच्या खात्यातून लाखो रुपये चोरीला गेले आहेत. त्यामुळे शासनाच्या कारभारावर यानिमित्ताने प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहेत. आरोपींनी शिक्षण विभागाचे बनावट स्टॅम्प, बनावट चेक आणि बनावट स्वाक्षरीद्वारे चार टप्प्यात ४७ लाख ६० हजार काढल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी मरीनड्राइव्ह पोलीस ठाण्यात चौघांवर कमल ४१९, ४२०, ४६५, ४६७, ४७१, ४७३, ३४ अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. शिक्षण विभागाच्या खात्यातून चोरीला गेलेली रक्कम ही नमिता बग, प्रमोद सिंग, तप कुमार, झितन खातून यांच्या खात्यावर जमा झाल्याचे पोलिसांच्या तपासात समोर आले आहे. याबाबत पोलीस अधिक चौकशी करत आहेत.

एका महिन्यात दुसऱ्यांदा अशी घटना घडल्याने संपूर्ण राज्याचा कारभार हाकणारी यंत्रणा सुरक्षित नसल्याचे यानिमित्ताने समोर आले आहे. मंत्रालयात प्रवेश करताना प्रत्येकाची अगदी काटेकोरपणे तपासणी केली जाते. सीसीटीव्हीने सगळ्यांवर नजर असते तरीही हा प्रकार घडल्याने अनेक तर्कवितर्क लावण्यात येत आहेत. या प्रकारामुळे विरोधकांच्या हाती ऐन निवडणुकीच्या काळात आयते कोलीत मिळाले आहे. शालेय शिक्षण विभागाच्या मंत्रालय येथील बँकेत असलेल्या खात्यातून हा गैरप्रकार घडला आहे. मात्र अशा प्रकारे शासनाच्या खात्यातून पैसे चोरीला जाण्याची ही काही पहिली वेळ नाही. या आधी पर्यटन विभागाच्या खात्यातूनही अशाच प्रकारे ६७ लाख चोरीला गेले होते. शासनाच्या खात्यातून अशा प्रकारे लाखो रुपये चोरीला जात असल्याने अनेकांच्या भूवया उंचावल्या आहेत.

निवडणुकीच्या धामधुमीत शासनाचे आपल्या विभागाकडे लक्ष आहे की नाही असाच सवाल या निमित्ताने उपस्थित होत आहे. मंत्रालयात जी बँक आहे. तिथून ही रक्कम चोरीला गेली आहे. ज्या आरोपीच्या खात्यात ही रक्कम जमा झाली आहे. ती सर्व खाती कोलकाता येथील आहेत. महिन्याभरात ही दुसरी घटना असून आता तरी शासन जागे होणार का? असा सवाल विचारला जाऊ लागला आहे

राष्ट्रपती भवनात पद्मविभूषण, पद्मभूषण आणि पद्मश्री पुरस्कार प्रदान

नवी दिल्ली । वृतसंस्था

सोमवारी (ता.२२) संध्याकाळी राष्ट्रपती भवनात पुरस्कार वितरण समारंभ पार पडला. यावेळी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी पद्मविभूषण, पद्मभूषण आणि पद्मश्री पुरस्कार प्रदान केले. यावेळी मुर्मू यांनी ३ पद्मविभूषण, ८ पद्मभूषण आणि ५५ पद्मश्री असे पुरस्कार प्रदान केले. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहांसह इतर मान्यवर उपस्थित होते. सरकारने यावर्षी २५ जानेवारीला रोजी पद्म पुरस्कारांची घोषणा केली होती.

२०२४ साठी ५ जणांना पद्मविभूषण, १७ जणांना पद्मभूषण आणि १११ जणांना पद्मश्रीची घोषणा करण्यात आली होती. यापैकी ६६ जनांना पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. तर इतरांचा सन्मान पुढील आठवड्यात करण्यात येणार आहे.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी माजी उपराष्ट्रपती एम व्यंकय्या नायडू, बिंदेश्वर पाठक (मरणोत्तर), कोनिडेला चिरंजीवी, वैजयंतीमाला बाली आणि पद्मा सुब्रमण्यम यांना पद्मविभूषण देऊन सन्मानित केले. यावेळी बिंदेश्वर पाठक यांच्या पत्नी अमोला पाठक यांनी हा पुरस्कार स्वीकारला. यावेळी पद्म पुरस्कार प्राप्त करणाऱ्यांमध्ये विविध क्षेत्रातील ३० महिलांचा समावेश असून नऊ व्यक्तींना मरणोत्तर पद्म पुरस्कार सन्मानित करण्यात आले आहे. तसेच परदेशी आठ व्यक्तींनाही पद्म पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी एम फातिमा बीवी (मरणोत्तर), होर्मुसजी एन कामा, मिथुन चक्रवर्ती, सीताराम जिंदाल, यंग लिऊ, अश्विन बालचंद मेहता, सत्यव्रत मुखर्जी (मरणोत्तर), राम नाईक, तेजस मधुसूदन पटेल, ओलान्चेरी राजगोपाल, राजगोपाल, राजगोपाल दादाजी, राजकुमार दास यांचा सन्मान केला. तोगडन रिनपोचे (मरणोत्तर), प्यारेलाल रामप्रसाद शर्मा, चंदेश्वर प्रसाद ठाकूर, उषा उथुप, विजयकांत (मरणोत्तर), कुंदन आर व्यास यांना पद्मभूषणने सन्मानित करण्यात आले. पद्म पुरस्कार, देशाच्या सर्वोच्च नागरी सन्मानांपैकी एक असून तो पद्मविभूषण, पद्मभूषण आणि पद्मश्री या तीन श्रेणींमध्ये दिला जातो. हा पुरस्कार कला, सामाजिक कार्य, सार्वजनिक घडामोडी, विज्ञान आणि अभियांत्रिकी, व्यापार आणि उद्योग, वैद्यक, साहित्य आणि शिक्षण, क्रीडा, नागरी सेवा आणि इतर क्षेत्रांत उल्लेखनिय कामगिरी करणाऱ्यांना दिला जातो. अपवातर दात्मक उच्च दर्जाच्या विशिष्ट सेवेसाठी पद्मभूषण आणि कोणत्याही क्षेत्रातील विशिष्ट सेवेसाठी पद्मश्री पुरस्कार दिला जातो.

पान १वरून...

पंकजाताईंच्या महाविजयासाठी

अर्ज दाखल करण्याच्या पहिल्याच दिवशी अगदी साधेपणाने उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा निर्णय घेतला होता. परंतु विविध घटकातील नागरिकांनी उमेदवारी अर्ज भरताना उपस्थित राहून, समर्थन देण्याची इच्छा प्रकट केली. लोकभावनेचा आदर बाळगून बुधवारी सकाळी साधेपणाने पंकजाताईंचा उमेदवारी अर्ज भरणार असून, विविध घटकातील लोकांच्या इच्छेनुसार दुपारी ०३.०० वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यापासून पारस नगरी, माने कॉम्प्लेक्स पर्यंत रॅलीचे आयोजन केले आहे. पारस नगरी, माने कॉम्प्लेक्स येथे जाहीर सभेने या रॅलीचा समारोप होईल. साय. ६ वा. येथे जाहीर सभा होणार आहे. जन मनांचा प्रत्यक्ष अशीर्वाद घेण्यासाठी ही जन आशिर्वाद रॅली काढण्यात येत आहे. यावेळी भाजपा महायुती पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी बहुसंखेने सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

पतंजलीने मागितली ६७

न्यायालयाने सांगितले होते. तुमच्यात क्षमेची भावना नाही, असे ताशेरे न्यायालयाने ओढले होते. इंडियन मेडिकल असोसिएशनने पतंजलीविरोधात ही याचिका दाखल केली आहे.

जाणूनबुजून महागडी औषधे लिहून देणाऱ्या डॉक्टरांची नोंदणी रद्द करण्याची तरतूद आहे का – सर्वाच्च न्यायालय

ॲलोपॅथी डॉक्टर त्यांच्या प्रिस्क्रिप्शनमध्ये विशिष्ट ब्रँडची महागडी औषधे का लिहून देतात? असा सवाल न्यायालयाने इंडियन मेडिकल असोसिएशनला केला आहे. जाणूनबुजून महागडी औषधे लिहून देणाऱ्या डॉक्टरांची नोंदणी रद्द करण्याची तरतूद आहे का? अशी विचारणा सुप्रीम कोर्टाने राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाला केली आहे.

आजच्या विराट रॅलीमध्ये हजारोंच्या

प्रत्येक गावात दर्जेदार रस्ते केले. जलयुक्त शिवारच्या माध्यमातून मोठी कामे केली. शेतकर्यांना हजारो कोटी रूपयांचा पिकविमा मिळवून दिला. जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या दर्जेदार ईमारती उभारल्या. अशा या डोळ्याने दिसणारा विकास करणार्या नेतृत्वाला बीडची सर्वसामान्य जनता दोन लाखापेक्षा अधिक मताधिक्याने विजयी करणार आहे. पंकजाताई ह्या बुधवारी बीड येथे भव्य अशी विजयी संकल्प रॅली काढून उमेदवारी अर्ज भरणार आहेत. यावेळी भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, मनसे, रिपाइं, रासप तसेच मित्रपक्षाचे दिग्गज नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत. ताईंच्या रॅलीत तसेच उमदेवारी अर्ज भरल्यानंतर होणार्या विराट सभेला हजारो- लाखोंच्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन भाजपाचे राज्य कार्यकारीणी सदस्य तथा बीड जिल्हा सरचिटणीस सर्जेराव तांदळे यांनी केले आहे.

सबका साथ सबका विकास

करण्यात येत आहे का? असे अनेक प्रश्न यावेळी उपस्थित होत आहेत. नरेंद्र मोदी यांनी अलीकडच्या काळात हिंदुत्वापेक्षा विकासाला महत्त्व दिले. मुस्लिम राष्ट्रांमध्ये जाऊन भेटी दिल्या. मुस्लिम समाजातील काही रीतीरीवाजाबाबत कायदे केले. त्यामुळे आपले नेतृत्व सर्वभिमुख असल्याचे त्यांनी वारंवार दाखवण्याचा प्रयत्न केला. यादरम्यान हिंदुत्वाचा मुद्दा प्रामुख्याने पुढे येणार नाही याची सुद्धा त्यांनी काळजी घेतली. लोकसभा निवडणुकीचा पहिला टप्पा पार पडल्यानंतर अचानक नरेंद्र मोदी यांनी आपल्या प्रचाराचा ट्रॅक बदलत थेट हिंदुत्वाचा आधार घेतला. नेमकं पहिल्या टप्प्यात असं काय झाला आहे की नरेंद्र मोदी यांना सबका साथ सबका विकास हा मुद्दा बाजूला करत हिंदुत्व त्यांना दिसले. पहिल्या टप्प्यामध्ये कुठेतरी भाजपला कमी जागा मिळत असल्याचा अंदाज कदाचित त्यांना आला असावा. तसेच पुढे होणाऱ्या लोकसभा निवडणुकीमधील इतर टप्प्यांमध्ये सुद्धा जनतेच्या मनात काहीतरी वेगळा सूर आहे याचा अंदाज त्यांना आला असावा. त्यामुळे आपल्या मूळ हिंदुत्व या विचारधारेकडे वळताना नरेंद्र मोदी यांनी मुस्लिम समाजाचा मुद्दा पुढे करत काँग्रेसवर जोरदार हल्लाबोल केला. त्यामुळे येणाऱ्या काळात भाजपकडून हिंदू कार्डचा वापर प्रभावीपणे करण्यात येईल, असे दिसते. तसे असेल तर नरेंद्र मोदी यांनी विकासाच्या बाबतीमध्ये जे काही वल्गना केल्या त्या फोल आहेत की काय अशी शंका आता सर्वसामान्यांना येत आहे.

सरकारच्या निर्यात बंदीची

निर्यात केली जाते. परंतु अपेडाची निर्यातसुद्धा एप्रिल-फेब्रुवारी २०२२-२३ मधील २४ अब्ज डॉलरच्या तुलनेत ६.८५ टक्क्यांनी घसरून २२.४ अब्ज डॉलरवर आली आहे. तर अपेडा निर्यात करत असलेल्या प्रमुख २४ मालापैकी १७ प्रकारच्या मालांची निर्यात काहीशी सुधारली आहे. त्यामध्ये ताजी फळे, म्हशीचे मांस, प्रक्रिया केलेल्या भाज्या, बासमती तांदूळ आणि केळीचा समावेश आहे. दरम्यान, मद्याच्या निर्यातीत काहीशी सुधारणा झाली आहे. इस्रायल-इराण युद्धाचा शेतमाल निर्यातीवर कसलाही परिणाम झाला नसल्याचे एका अधिकाऱ्याने म्हटले आहे. परंतु लाल समुद्रातील तणाव, रशिया-युक्रेन युद्ध आणि केंद्र सरकारच्या धोरण धरसोडीचा फटका शेतकऱ्यांना बसला आहे. मागील तीन वर्षांपासून प्रमुख शेतमालाच्या निर्यातीत केंद्र सरकारने खोडा घालून दर पडल्याचे शेतकरी सांगतात.

परळी, दिंद्रुड परिसरात अवकाळीचा

तात्काळ मदतीची गरज आहे. परळी शहर व तालुक्यात मंगळवारी सायंकाळच्या सुमारास वादळी वाऱ्यासह गारांचा जोरदार पाऊस झाला. यात शहरातील विद्यानगर भागात असलेल्या राहत्या घरातील नारळाच्या झाडावर वीज पडल्याची घटना घडली. सुदैवाने यात जिवीत हानी झाली नाही. या अवकाळीत तालुक्यातील अनेक ठिकाणी शेतीमालाचे प्रचंड नुकसान झाले तर अनेक ठिकाणचे ओढे, लहान नद्या यांना पाणी आले. परळी शिवाय माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड, कांदेवाडी, देवदहिफळ, तेलगाव जवळा परिसरात वादळी वाऱ्यासह गारांचा जोरदार पाऊस झाला. विजांच्या गडगडाटासह आलेल्या पावसात शेती मालाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. विशेष करून फळबागांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून, शेतकरी हवालदिल झाले आहेत. शेतांमध्ये गारांचा खच पडल्याचे यावेळी दिसून आले. याशिवाय जोराच्या वाऱ्यात रस्त्यावरील झाडे उन्मळून पडली. गेल्या आठवड्यापासून जिल्ह्यात विविध ठिकाणी अवकाळीने नुकसान होत आहे. यापुर्वी धारूर, वडवणी आणि गेवराई तालुक्यातील सिरसमार्ग परिसरात अवकाळीने कहर केला होता. यामध्ये मोसंबीच्या बागा उद्ध्वस्त होण्यासोबतच आंबा बांगांचे नुकसाने झाले होते. आता परळी आणि दिंद्रुड परिसरातही अवकाळी पावसाने मोठे नुकसान केले आहे. शेतकरी यामुळे अडचणीत सापडला असून, शासनाने या भागातील शेतकऱ्यांना तातडीने मदत करावी, अशी मागणी केली जाऊ लागली आहे.

बीड परळी हाय वे वर झाडे पडली

तेलगाव ते भोपा, बीड – परळी हाय वे वर लिंब, बाभळीची झाडे या वादळी वाऱ्यामुळे पडल्याने रस्त्यावरील वाहतूक काही काळ ठप्प झाली होती. सुमारे तासभर झालेल्या या वादळी पावसात आतोनात नुकसान झाले आहे.

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
बुधवार, दि. २४ एप्रिल २०२४ ३

माजलगावमध्ये गाडीतील पेट्रोल चोरी वाढली

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव शहरात गाडयातील पेर्टोल काढण्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले असुन याला त्वरित आळा बसला अशी मागणी नागरिकांतुन जोर धरू लागली आहे. माजलगाव शहरांतील विविध भागात कंपाऊंड च्या आत बाहेर गाडचा सोडलेल्या असतात. या गाडयातील पेर्टोल चोरीचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे.

पोलीसांनची गस्त सगळीकडे असुन सुद्धा यंत्रणेला चोर भितात की नाही अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. माजलगाव शहर विस्ताराने खुप मोठे झाले असुन दोन चाकी वाहने आनेक ठिकाणी दारा समोर लावलेली असतात.गाडयाचे प्रमाण ही मोठ्या प्रमाणात वाढले आहे.त्यामुळे गाड्या सोडण्यासाठी जागा ही कमी पडत आहे. त्यामुळे दारा समोर सोडलेल्या गाडया मोंढा भाग, भीमनगर रस्ता, नवनाथ नगर,शाहु नगर, सन्मित्र कऑलनई या ठिकाणी पेर्टोल चोरीचे प्रमाण प्रचंड वाढले आहे. पोलिस यंत्रणेने प्रेर्टोल चोराच्या मुसक्या लवकरात लवकर आवळाव्यात अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

डीजेच्या दणदणाटात भारतीय संस्कृतीचा गुदमरतोय श्वास

सनई-चौघडा,नगारा,तुतारी,हालगी,लैजीम,ढोल-ताशा व झांज पारंपरिक वाद्य लुप्त होण्याच्या मार्गावर

ज्योतिराम पाढंरपोटे । माजलगाव

संपूर्ण गाव दणाणून सोडणाऱ्या डीजे'च्या कर्णकर्कश्श आवाजामुळे ज्येष्ठ नागरिक, आजारी व्यक्तींच्या जीवाची घालमेल होत आहे. डीजे'च्या फॅडमुळे पारंपरिक वाद्य लुप्त होण्याचा धोका निर्माण झाला आहे. गावचे गावपण व संस्कृती टिकविण्यासाठी युवावर्गानि पारंपरिक वाद्य जपत 'डीजे'ला ब्रेक लावण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.गावोगावच्या यात्रोत्सवांना सध्या सुरुवात झाली असून,यानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जात आहे.ग्रामदैवतांच्या पालखी मिरवणुका डीजे'च्या तालावर निघत आहेत. यामुळे सनई-चौघडा, नगारा, तुतारी, हालगी, लेजीम,ढोल,ताशा,झांज आदी पारंपरिक वाद्य लुप्त होऊ लागली आहेत.

सध्या गल्लोगल्लीत 'डीजे'चा आवाज घुमू लागला असून, त्यामुळे ज्येष्ठ नागरिकांसह विविध आजारांच्या रुग्णांना त्रास होत आहे.'डीजे'च्या कर्णकर्कश्श आवाजमुळे छाती धडधडणे आणि श्वासावरचे नियंत्रण सुटण्याच्या तक्रारी आता समोर येऊ लागल्या आहेत. शास्त्रीय दृष्टिकोन पाहता,या ध्वनिलहरीच्या कंपनामुळे मुक्या प्राण्यांनाही त्रास होत आहे.वाढत्या ध्वनिप्रदूषणामुळे अनेक पक्ष्यांनी नागरी वस्तीतून स्थलांतर केले आहे. पक्ष्यांचे प्रमाण कमी होण्यास 'डीजे'चा दणदणाट हे एक कारण असल्याचे पक्षीतज्ज्ञ सांगत आहेत.

> नागरिकांचे आरोग्य लक्ष्यात घेता मुळात कोणत्याही कार्यक्रमात 'डीजे' ला परवानगी दिली जात नाही. दिली तरी आयोजकांनी आवाजाच्या मर्यादेचे पालन करणे आवश्यक आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई केली जात आहे. डीजेमुळे काही ठिकाणी दुर्घटना घडल्या आहेत. यामुळे अनेक गावांनी 'डीजे' वर बंद आणली आहे. असाच विचार सर्व गावांमध्ये झाला पाहिजे.
> केतन राठोड, पोलीस निरीक्षक, माजलगाव शहर.

पारंपरिक वादकांवर उपासमारीची वेळ

आज गावांतील तरुणाई 'डीजे'साठी आग्रही असल्याचे चित्र ठिकठिकाणी दिसून येत आहे. यामुळे सनई-चौघडा, नगारा,तुतारी,हालगी, लेजीम, ढोल, ताशा, झांज आदी पारंपरिक वाद्य लुप्त होत असल्याचे चित्र गेल्या काही वर्षांपासून दिसून येत आहे.यामुळे या वादकांवर उपासमारीची वेळ आली आहे.

डीजेचे हे होताहेत दुष्परिणाम

✲ डीजे'च्या कर्णकर्कश्श आवाजामुळे ज्येष्ठ नागरिक, आजारी व्यक्तींच्या प्रकृतीवर विपरीत परिणाम ✲ कर्णकर्कश्श आवाजामुळे छाती धडधडणे, श्वासावरचे नियंत्रण सुटणे आणि अस्वस्थ वाटत असल्याच्या नागरिकांच्या तक्रारी ✲ सनई-चौघडा, नगारा, तुतारी,हालगी लेजीम,ढोल,ताशा, झांज आदी पारंपरिक वाद्य लुप्त होण्याच्या मार्गावर

✲ ध्वनिलहरीच्या कंपनामुळे मुक्या प्राण्यांनाही त्रास होत असून, अनेक पक्ष्यांनी नागरी वस्तीतून केले स्थलांतर

डीजे' ची डोकेदुखी दिवसेंदिवस वाढत आहे. विविध आजार व हवामानातील बदलामुळे ज्येष्ठांसह नागरिकांत आरोग्याच्या तक्रारी वाढत आहेत. त्यात 'डीजे' च्या कर्णकर्कश आवाजामुळे आणखी भर पडत आहे. याचा विचार कोणी करताना दिसत नाहीत. डीजेचा आवाज कुठे तरी थांबायला हवा आणि आपली पारंपरिक संस्कृती जपण्यासाठी सर्वांनी पुढे येणे गरजेचे आहे.

हृदयविकार, डायबेटिस होण्याचा धोका

हृदयरोग तज्ज्ञ डॉ. यशवंत राजेभोसले म्हणतात की,ध्वनी प्रदूषणामुळे व्यक्तीच्या आरोग्यावर घातक परिणाम होतात. ध्वनी प्रदूषणामुळे आर्टियल हायपरटेंशन म्हणजेच हृदयावर ताण येणं, मायोकार्डियल इंफ्रेक्शन म्हणजे हार्ट अॅटॅक येणं किंवा स्ट्रोक सारखे त्रास होऊ शकतात.तसंच रक्तदाब वाढण्याची शक्यता असते, हृदयाची धडधड वाढते आणि हार्मोनच्या पातळीत बदल होतो.सतत मोठ्या आवाजात वावरलं तर जीवाला धोका उत्पन्न होऊ शकतो.

ऐकण्याच्या क्षमतेवर परिणाम

कान-नाक-घसा तज्ज्ञ असलेल्या डॉ यादव सांगतात की, सतत मोठा आवाज कानावर पडला तर बहिरं होण्याची शक्यता असते. मोठ्या आवाजामुळे कानाच्या आतल्या पेशींना इजा होते. त्यामुळे माणसाच्या ऐकण्याच्या क्षमतेवर परिणाम होतो.जितका जास्त काळ हा आवाज पडेल तितका धोका वाढत जातो.अनेकदा कानात सतत शिटी वाजल्यासारखे, मधमाशा गुणगुणल्यासारखे आवाज येतात. याला टीनीटस असं म्हणतात.ही परिस्थिती तात्पुरती असू शकते किंवा कायमस्वरूपीही. मोठ्या आवाजामुळे होणारे बहिरेपणाचे किंवा कानाचे त्रास टाळता येण्यासारखे आहेत.डीजे-डॉल्बीवर असणारी बंदी त्यामुळे स्वागतार्ह आहे.

पंधराव्या शिवार साहित्य संमेलनाचे ग्रंथ पूजन व ग्रंथ दिडीने सुरुवात

माजलगाव । प्रतिनिधी

मराठवाडा साहित्य परिषद शाखा माजलगाव च्या पंधराव्या शिवार साहित्य संमेलनाची सुरुवात ना.धो.महानोर साहित्य नगरी फुले पिंपळगाव) मध्ये झाली.

साहित्य संमेलनाचा उदेश हा ग्रामीण भागामध्ये साहित्य चळवळ रुजवण्याचा उपक्रम म्हणून या शिवार साहित्य संमेलनाची सुरुवात मागील १४ वर्षांपूर्वी केलेली आहे. या निमित्ताने प्रत्यक्ष शिवारावर जाऊन ग्रामीण भागात जे काही साहित्यिक असतील कवी असतील यांना त्यांचा हक्काचे व्यासपीठ मिळावं त्यांची जी प्रतिभा आहे ही सर्वांसमोर यावी, या उद्देशाने शिवार साहित्य संमेलनाची सुरुवात केलेली आहे. यावेळी ग्रंथाचे पूजन ह भ प रामराव महाराज फुलगे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ग्रंथ दिंडी मध्ये गाय,वासरू,घोड्याच्या सहभाने व उंटाच्या पाठीवरून ग्रंथाची मिरवणूक काढण्यात आली. याप्रसंगी संमेलनाअध्यक्ष अनिल कुमार साळवे,स्वागत अध्यक्ष जगदीश पोफळे,मसाप शाखा अध्यक्ष मुकुंदराज सोळंके,उपाध्यक्ष प्रा. स्नेहल पाठक,कार्यवाह डॉ भाऊसाहेब राठोड,कोषाध्यक्ष किशोर गुंजकर,, सहकार्यवाह बालासाहेब झोडगे, सहकार्यवाह डॉ उमेश साडेगावकर, प्रा. डॉ.वैशाली गोस्वामी,पूर्व संमेलन अध्यक्ष राही फपाळ,विशाल वायाळ,खेलबा काळे, प्रशांत खडके,बालाप्रसाद गौरीताई देशमुख स्मिताताई लिंबगावकर सोमेश पोपळे,रोमेश पोपळे,मोहन राठोड,कैलास सोळंके,वैभव सोळंक,संजय चव्हाण,सखाराम जोशी,सिंदफना पब्लिक स्कूलचे विद्यार्थी यांच्यासह साहित्यप्रेमी व नागरिक उपस्थित होते.

मोफत त्वचा रोग तपासणी शिबीर - डॉ. जेथलिया

माजलगाव । प्रतिनिधी

शहरातील जुना कोर्ट रोड, श्री सिद्धेश्वर महाविद्यालय च्या बाजूला असलेल्या जेथलिया हॉस्पिटल येथे २८ एप्रिल २०२४ रविवार रोजी बीड येथील प्रसिद्ध त्वचा रोग तज्ञ डॉ संजय बजाज यांचे मोफत त्वचा रोग तपासणी शिबीर यांचे सकाळी ११ ते ३या वेळेत आयोजित केले आहे तरी यांचा लाभ घ्यावा असे आवाहन डॉ ऋषिकेश जेथलिया यांनी केले आहे.

शहरात नव्यानेच झालेल्या जेथलिया हॉस्पिटल ला २८एप्रिल रोजी एक महिना होत असून या निमित्त बीड येथील प्रसिद्ध त्वचा रोग तज्ञ डॉ संजय सतिश बजाज यांच्या मोफत त्वचा रोग शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.या शिबिरात तरुणच्या चेहऱ्यावरील पीपल्स, वांग, काळे डाग, सोरायसिस, गजकर्ण तसेच केसाचे विकार, नखाचे विकार, गुप्तरोग, कुष्टरोग, सोंदर्यवर्धक उपचार यांची तपासणी करण्यात येणार आहे. सोबतच रक्त तपासणीवर ही ५०%पर्यंत ची सूट या दिवशी दिली जाणार आहे. तरी या शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन डॉ ऋषिकेश संतोषकमार जेथलिया यांनी केले आहे.

सांगवी पाटण येथे दोन दिवसीय भैरवनाथ यात्रेला सुरुवात

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील सांगवी पाटण येथील जागृत देवस्थान म्हणून ओळखले जाणारे भैरवनाथ मंदिर असून येथील यात्रेमध्ये २२ एप्रिल रोजी श्रीक्षेत्र पैठण,नागतळा येथून आलेल्या कावडीची मिरवणूक काढण्यात आली. २३ एप्रिल रोजी सकाळी वाजत गाजत शेरणी, दंडवत, लोटांगण घेऊन भाविक भक्त नवस पूर्ण करतात, तीन ते सहा यावेळेस मुख्य आकर्षण, मंदिरावर ,लाइटिंग सजावट डेकोरेशन बँजो, डिजे, डोल, ताशा . लेझिम पथक,देखावा,युवकांचा डान्स, भव्य दिव्य काठी मिरवणूक कार्यक्रम संपन्न होणार आहे , रात्री सहा ते आठ यावेळेस वाटण्याची जुनी परंपरा अजूनही जुनी प्रथा कायम आहे. नंतर रात्री छबिना काढून गावात रातभर मिरवणूक काढण्यात येणार आहे, पहाटे शोभेची दारूची आतिश बाजी करण्यात येते, यावेळी यात्रे मध्ये खेळणी दुकाने, खाऊची दुकाने, महाप्रसादाची दुकाने असे अनेक प्रकारचे दुकाने थाटली जाते,, यात्रेमध्ये भावी नवरदेव यांनी दर्शनासाठी जास्त गर्दी करतात,नंतर कुस्त्याचा हंगामा संपन्न होणार आहे , पंचक्रोशीतील पाटण, कोहिनी, खीळद, लिंबोडी,

बावी,डोईठाण, सुरुडी, धामणगाव, कारखेल, लमाणतांडा, पुणे, मुंबई, अहमदनगर, तसेच महाराष्ट्रतून भाविक भक्त भैरवनाथांचे दर्शन घेण्यासाठी येत असतात , त्यांनी दर्शनाचा लाभ घ्यावा असे आव्हान सरपंच दत्तात्रय खोटे आणि समस्त ग्रामस्थ सांगवी पाटण यांनी केले.

विविध उपक्रमांनी हनुमान जयंती साजरी

अंबाजोगाई । प्रतिनिधी

'रामभक्त हनुमान की जय' पवनसुत हनुमानजी की जय', ''जय बजरंग', अशा जयघोषात हनुमान जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा झाला. भक्तिपूर्ण वातावरणात सूर्योदयाच्या वेळेस जन्मोत्सव संपन्न झाला. रविवार पेठेतील हनुमान मंदीरात चौंडेश्वरी महिला मंडळाच्या भजनासह विविध धार्मिक कार्यक्रम संपन्न झाले यानिमित्त पहाटे हनुमानाच्या मूर्तीस महाभिषेक, जप व आरती करून विधिवत पूजा करण्यात आली. जन्मवेळी उपस्थित भाविकांनी पुष्पवृष्टी करून संकटमोचन हनुमान की जय, जय श्रीराम... जय श्रीराम..... च्या जयघोषात हनुमानाचा जन्मोत्सव साजरा केला. यावेळी कमलाकर चौसाळकर, अनिरुद्ध चौसाळकर, प्रभाकर सेलमुकर,शिवप्रसाद रांदड, प्रा.डॉ.गणेश पिंगळे, अंबादास चिक्षे, प्राचार्य रमण देशपांडे, नृसिंह चिक्षे,श्रीकृष्ण पेडगांवकर, दिलीप काळे,अॅड.जयदीप विर्धे, शामराव कंगळे, दुर्गादास चौधरी, राहूल देशपांडे,श्रीपाद चिक्षे, कल्याणी विर्धे आदीसह भाविक उपस्थित होते.हनुमान जयंती निमित्त शहरातील हनुमान मंदिरात फुलांची आकर्षक सजावट करण्यात आली होती.

शहरातील बडा हनुमान,मोंढा भाग, बस स्थानक परिसर,अंबिका सोसायटी,मंगळवार पेठ, कुत्तर विहिर,खडकपुरा, भट्ट गल्ली,बंकट गल्ली, यासह इतर ठिकाणच्या हनुमान मंदीरातही भविकांच्या उपस्थितीत जन्मोत्सव सोहळ्या निमित्त महाप्रसाद,भजन,किर्तन आदी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

रविवारी मतदार जागृतीसाठी सायकल फेरी

बीड । प्रतिनिधी

'सायकल चालवा आरोग्यासाठी, मतदान करा लोकशाहीसाठी' या उक्तीप्रमाणे रविवारी दिनांक २८ एप्रिल रोजी बीड जिल्ह्यात मतदार जागृतीसाठी सायकल फेरी ('सायक्लोथॉन') हा विशेष उपक्रम मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी राबवलि जाणार आहे.

सोमवार दि.१३ मे, २०२४ रोजी ३९ बीड लोकसभा मतदार संघात मतदान होणार आहे. मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी जिल्ह्यात विविध उपक्रम राबविले जात आहेत. या अंतर्गतच आज जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांच्या मार्गदर्शनात सायकल फेरी ('सायक्लोथॉन') उपक्रमाविषयीची बैठक आयोजित करण्यात आली. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, उपजिल्हा निवडणूक अधिकारी महेंद्रकुमार कांबळे, स्विपचे नोडेल अधिकारी डॉ. विक्रम सारूक यांच्यासह जिल्ह्यातील विविध सायकल क्लबचे पदाधिकारी व सदस्य तसेच पोलीस, महिला, डॉक्टर, जिल्हा परिषद, महसूल सायकल संघटनेचे सदस्य उपस्थित होते.

रविवारी दिनांक २८ एप्रिल सकाळी सात वाजता छत्रपती संभाजी क्रीडा संकुल (मल्टीपर्पस ग्राउंड) येथून सायकल फेरीची सुरूवात होईल. बीड शहरातील मुख्य रस्त्यावरून किमान दहा किलोमीटर सायकल चालवून मतदारांना मतदान करण्यासाठी जागरुकता निर्माण केली जाईल.

या सायकल फेरीमध्ये बीड मधील मतदार नागरिक स्वयंस्फूर्तीने सहभागी होऊ शकतात. पांढरा टी-शर्ट व काळी पॅन्ट घालून या मॅरेथॉनचा हिस्सा होऊन 'मी मतदान करणार असा संदेश मतदारांनी द्यावा', असे आवाहन जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी यांनी यावेळी केले. मुद्रित तसेच इलेक्ट्रॉनिक माध्यमातील पत्रकारांनी, माध्यमकर्मींनीही या सायक्लोथॉनमध्ये सहभाग नोंदवून मतदारांना मतदानासाठी जागरुक करावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

ग्राहक पंचायत महाराष्ट्रची साप्ताहिक बैठक संपन्न

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई शहरातील खोलेश्वर महाविद्यालय अंबाजोगाई येथे रविवार, दि. २१ एप्रिल रोजी ग्राहक पंचायत,महाराष्ट्र शाखा-अंबाजोगाई यांची साप्ताहिक बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.या प्रसंगी या प्रसंगी ग्राहक पंचायत महाराष्ट्रचे अध्यक्ष पांडुरंगराव चव्हाण, जिल्हा सचिव दिनकरराव पसारकर यांनी उपस्थित नवीन सदस्यांना ग्राहक पंचायत कार्याची माहिती देऊन सर्व सदस्यांना सक्रिय सहभागी व्हावे असे त्यांनी यावेळी आवाहन केले. सर्व सदस्यांचा वैयक्तिक परिचय घेण्यात आला. या बैठकीत उपस्थित डॉ.तात्याराव पुरी, डॉ. फुलारी, शिरीष हिरळकर, प्रा.पालमकर, प्रा.चिटणीस, प्रविण कुलकर्णी, प्रा.राजेंद्र बनसोडे, प्रा.डॉ. मनोज कुलकर्णी यांच्यासह सर्व पदाधिकारी उपस्थित होते व नवीन सदस्य आणि पदाधिकारी यांचे आभार संघटक प्रा.हनुमंत देशमुख यांनी मानले.

प्रदीप कुलकर्णी यांची नवीन कादंबरी प्रकाशनाच्या मार्गावर

माजलगाव । प्रतिनिधी

येथील सुप्रसिद्ध साहित्यिक तथा संपादक प्रदीप कुलकर्णी यांची ''प्रेमात पडायचे होते पण'' ही नवीन कादंबरी बेंगलोर येथील प्रतिलिपी च्या वतीने लवकरच प्रकाशित होणार असून वाचकांना ती ॲमेझॉन वर खरेदी साठी उपलब्ध असणार आहे.

माजलगाव जिल्हा बीड येथील माजलगाव परिसर या वृत्तपत्राचे संपादक तथा सुप्रसिद्ध लेखक प्रदीप कुलकर्णी यांनी आतापर्यंत दहा कादंबऱ्या लिहिल्या असून त्यातील एक निवांत ही कादंबरी पुस्तक रूपाने यापूर्वी १९८४ साली प्रकाशित झाली होती. आता तब्बल चार दशकानंतर त्यांची ''प्रेमात पडायचे होते पण'' ही नवीन कादंबरी लवकरच पुस्तक रूपाने वाचकांच्या हातात पडणार आहे. या कादंबरी साठीची प्रकाशन प्रक्रिया पूर्णपणे पार पडली असून लवकरच या कादंबरीचे प्रकाशन होणार असल्याचे लेखक प्रदीप कुलकर्णी यांनी सांगितले.

प्रतिलिपी मराठी चे व्यासपीठ मिळाल्यानंतर लेखक प्रदीप कुलकर्णी यांच्या लिखाणाचा वेग वाढला, महत्त्वाचे म्हणजे त्यांना लिखाणाचा छंद हा लहानपणापासून आहे, त्यांच्या अनेक कथा या दिवाळी अंक आणि विविध दैनिकांमध्ये प्रकाशित झाल्या आहेत प्रतिलिपी मुळे त्यांना एक चांगले व्यासपीठ मिळाले, आणि निवांत नंतर त्यांना या व्यासपीठाच्या माध्यमातून प्रेमात पडायचे होते पण ही कादंबरी प्रकाशित करण्याची संधी मिळाली आहे.

प्रतिलिपी च्या ॲपवर त्यांच्या दहा कादंबऱ्यां वाचनासाठी उपलब्ध आहेत. पैकी सहा कादंबऱ्या पूर्णपणे प्रकाशित झाल्या असून तीन कादंबऱ्या सध्या प्रतिलिपीवर प्रकाशित होणे चालू आहे. प्रतिलिपीवर त्यांच्या अनेक लघुकथा असून त्यांच्या 'विनयभंग' या लघु कथेने तर सर्वाधिक वाचक मिळविण्याचा विक्रम केला आहे. तर 'रंजना' ही कादंबरी देखील वाचकांच्या हृदयावर राज्य करून गेली आहे. अजूनही या कादंबरीला प्रचंड मागणी असून ही कादंबरी वाचणारांच्या संख्येत अमुलाग्र वाढ होत आहे. सध्या या कादंबरीची वाचक संख्या दीड लाखाच्या जवळपास पोहोचली आहे.

प्रेमात पडायचे होते पण, ही कादंबरी देखील त्यांनी प्रतिलिपीवर प्रकाशित केली असून या कादंबरीचे ५४ भाग आहेत ५४ भाग असलेल्या या कादंबरीचे पुस्तक रूपाने प्रकाशन होत असून पृष्ठ संख्या ४६४ आहे.

या कादंबरीचा विषय प्रेमाचा असला तरी प्रेम करण्याचे वय आणि प्रेम करताना ज्या मर्यादा असतात जे संस्कार घरातून झालेले असतात ते न विसरता या कथा नायकाने आणि कथा नायीके ने आपले वेगळेपण कसे दाखवून दिले ? हे यातून लेखकाने उत्कृष्टरित्या समाजापुढे मांडले आहे. ही कादंबरी नक्कीच वाचकांच्या पसंतीला उतरेल असा आत्मविश्वास लेखक प्रदीप कुलकर्णी यांनी व्यक्त केला आहे.

आष्टी तालुका दूध संघामार्फत शेतकऱ्यांना दोन कोटी ५४ लाख रुपयांचे दुध अनुदान वाटप

आष्टी । प्रतिनिधी

मागील काही दिवसापूर्वी दुधाचे दर कोसळल्याने शेतकरी वर्गाचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत होते. त्यावर विधान परिषद सदस्य आमदार सुरेश धस यांनी शासन दरबारी वेळोवेळी पाठपुरावा व मागणी करून दूध उत्पादकांना प्रति लिटर पाच रुपये प्रमाणे अनुदान देण्याचे शासनाने घोषित केले होते. त्यानुसार आष्टी तालुक्यातील अडीच हजार शेतकऱ्यांना मागील दोन महिन्याचे दोन कोटी ५४ लाख ७० हजार रुपयांचे अनुदान थेट बँक खात्यावर वाटप केले असल्याची माहिती आष्टी तालुका दूध संघाचे चेअरमन शांतीलाल भोसले व कार्यकारी संचालक मच्छिंद्र धनवडे यांनी दिली.

आष्टी तालुक्यामध्ये सर्वात जास्त प्रमाणामध्ये दुग्ध व्यवसाय केला जातो. तालुक्यातील शेतकऱ्यांची आर्थिक घडी ही पूर्णपणे दुग्ध व्यवसायावर अवलंबून आहे. यामध्ये युवकवर्ग ही मोठ्या प्रमाणात उतरल्याने तालुक्यामध्ये दुधाचे मोठ्या प्रमाणात उत्पन्न होत आहे. मात्र मागील काही दिवसांमध्ये अचानकपणे दुधाचे दर कोसळले यामुळे शेतकऱ्यावर आलेल्या अस्मानी संकटासाठी आमदार सुरेश धस धावून आले आणि शासन स्तरावर शेतकऱ्यांची बाजू लावून धरत प्रति लिटर पाच प्रमाणे अनुदान देण्याचा निर्णय शासनाने केला. त्यानुसार आष्टी तालुका दूध संघामार्फत दिनांक ११ जानेवारी २०२४ ते १० मार्च २०२४ या कालावधीमध्ये २५०० शेतकऱ्यांना दोन कोटी ५४ लाख ७० हजार रुपये दूध अनुदान वाटप केले असल्याचेही धनवडे व भोसले यांनी सांगितले. दूध अनुदानामध्ये अनेक प्रकारच्या जाचक अटी होत्या. त्या सर्व अटींची पूर्तता करण्यासाठी आष्टी तालुका पशुवैद्यकीय अधिकारी डॉक्टर मंगेश ढेरे व त्यांच्या संपूर्ण टीमने जनावरांना बिल्ले बसून देणे, ऑनलाईन नोंदणी अतिशय जलद पद्धतीने केल्यामुळे केल्यामुळे अनुदान मिळण्यात अडचणी निर्माण होऊ दिल्या नाहीत.

साखर उत्पादनात महाराष्ट्र आघाडीवर

सलग तिसऱ्या वर्षी युपीला टाकले मागे !

२०१ कारखाने आतापर्यंत बंद

राज्यात हंगाम घेतलेल्या २०७ पैकी २०१ कारखान्यांनी आपले गाळप थांबवले आहे. ५ ते ६ साखर कारखान्यांचे गाळप सुरू असून, या महिनाअखेरपर्यंत हळूहळू सर्व हे कारखाने बंद होतील, असे सांगण्यात येत आहे. आतापर्यंत ११० लाख टन साखरेचे उत्पादन झाले असून, यात आणखी वाढीची अपेक्षा आहे. राज्यात मराठवाड्यात विशेषतः धाराशिव, नांदेड, परभणी, हिंगोली जिल्ह्यांत नोव्हेंबर महिन्यात अवकाळी पाऊस पडला होता, सोलापूर व मराठवाडयातील जिल्ह्यांत ऊस गाळप वाढल्याचे साखर आयुक्त कार्यालयाकडून सांगण्यात आले.

गाळपासोबत उताराही वाढला

राज्यात यंदाच्या हंगामात ऊस गाळप १०६७ लाख मेट्रिक टन, तर १०९४ लाख क्विंटल साखर तयार झाली आहे. साखर आयुक्त कार्यालयाने सुरुवातीला १० टक्के साखर उतारा पडेल असे गृहीत धरले होते प्रत्यक्षात १०.२५ टक्के इतका उतारा पडला आहे. मागील वर्षी २११ साखर कारखान्यात १०५३.७१ मेट्रिक टन गाळप व १०५२.३ लाख क्विंटल साखर तर १० टक्के उतारा पडला होता.

साखर उत्पादनात महाराष्ट्राने आपली मक्तेदारी कायम ठेवली आहे. सलग तिसऱ्या वर्षी ११० लाख मेट्रिक टनांपेक्षा अधिक साखरेचे उत्पादन करत, अव्वल स्थान पटकावले आहे. उत्तर प्रदेशात १०५ लाख मेट्रिक टन साखर उत्पादन होणे अपेक्षित आहे. वर्षांच्या सुरुवातीला झालेला पाऊस आणि इथेनॉल निर्मितीवरील निर्बंधांमुळे साखरेच्या उत्पादनात मुळ अंदाजापेक्षा १५ ते २० टक्क्यांनी वाढ झाली असल्याचे सहकार विभागातील अधिकाऱ्याने म्हटले आहे.

गतवर्षी पावसाची अनियमितता आणि वातावरणातील बदलामुळे उसाच्या पिकावर परिणाम झाला होता. त्यामुळे राज्यात हंगामाच्या सुरुवातीस ८५ लाख मेट्रीक टन तर सुधारित अंदाजानुसार ९५ लाख मेट्रीक टन साखरेचे उत्पादन होईल, असा अंदाज वर्तविण्यात आला होता. राज्याप्रमाणे देशातही साखरेचे उत्पादन घटण्याची शक्यता केंद्राने वर्तविली होती. त्यामुळे २०२३-२४ चा गाळप हंगाम सुरू होताच, डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात केंद्राने उसाच्या रसापासून इथेनॉल निर्मितीवर बंदी घातली. परिणामी, साखरेचे उत्पन्न वाढले.

या दिवशी मिळणार नमो शेतकरी योजनेचा ४ था हफ्ता!

पुणे: महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठी आनंदाची बातमी आहे. ही बातमी पीएम किसान योजना आणि नमो शेतकरी महा सन्मान निधी योजनेच्या लाभार्थी शेतकऱ्यांसाठी अधिक आनंदाची आणि खास ठरणार आहे. खरंतर पीएम किसान सन्मान निधी योजना ही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दूरदृष्टीने सुरू झालेली केंद्राची एक महत्त्वाची योजना आहे. ही योजना केंद्रीय पुरस्कृत असून, याची सुरुवात २०१९ मध्ये झाली आहे. या योजनेअंतर्गत पात्र शेतकऱ्यांना ६००० रुपयाचा लाभ दिला जात आहे.

२ हजार रुपयाचा एक हप्ता असे एका आर्थिक वर्षात तीन हप्ते दिले जातात. दर चार महिन्यांनी दोन हजाराचा एक हप्ता शेतकऱ्यांच्या खात्यावर वर्ग केला जातो. पीएम किसान योजनेअंतर्गत आत्तापर्यंत एकूण १६ हप्ते पात्र शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा झाले आहेत. शेतकऱ्यांना आता आगामी सतराव्या हप्त्याची आतुरता लागलेली आहे. खरंतर पीएम किसान योजनेची लोकप्रियता पाहता महाराष्ट्र राज्यात वर्तमान शिंदे सरकारने या योजनेच्या धर्तीवर नवीन नमो शेतकरी योजना सुरू केली आहे. नमो शेतकरी योजनेचे स्वरूप हे पीएम किसान योजनेप्रमाणेच आहे. विशेष म्हणजे जे शेतकरी पीएम किसानसाठी पात्र ठरतात त्यांनाच नमो शेतकरीचा लाभ मिळतो. अर्थातच महाराष्ट्रातील ज्या शेतकऱ्यांना पीएम किसानचे सहा हजार रुपये मिळत आहेत त्यांना नमो शेतकरीचे देखील ६००० दिले जात आहेत. या नमो शेतकरी योजनेअंतर्गत आत्तापर्यंत एकूण तीन हप्ते दिले गेले आहेत. आता नमो शेतकरीचा चौथा केव्हा मिळणार हा सवाल शेतकऱ्यांच्या माध्यमातून उपस्थित केला जात आहे.

पीएम किसान आणि नमो शेतकरीचा हप्ता सोबतच मिळणार

खरेतर पीएम किसान योजनेचा मागील सोळावा हप्ता आणि नमो शेतकरी योजनेचा दुसरा आणि तिसरा हप्ता सोबतच दिला गेला होता. म्हणजेच पीएम किसान योजनेच्या मागील सोळाव्या हत्यासोबत राज्यातील शेतकऱ्यांना एकूण सहा हजार रुपयांचा लाभ मिळाला आहे. दरम्यान आता नमो शेतकरीचा चौथा हप्ता देखील हा पीएम किसान योजनेच्या पुढील सतराव्या हप्त्यासोबतच दिला जाऊ शकतो असा दावा केला जात आहे. पीएम किसान योजनेचा पुढील हप्ता हा जून महिन्याच्या अखेरीस किंवा जुलै महिन्याच्या पहिल्या आठवड्यात मिळू शकतो. म्हणजेच लोकसभा निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर काही दिवसांतच पीएम किसानचे २००० आणि नमो शेतकरीचे २००० असे एकूण ४००० रुपये राज्यातील शेतकऱ्यांना मिळणार असा अंदाज आहे.

केळी पिकात टरबूजाचे आंतरपीक; मिळाले दोन लाखांचे उत्पन्न!

यंदा पाऊस कमी असल्याने अनेक भागात शेती पिकांना पाण्याची कमतरता भासत आहे. अशा स्थितीत दुष्काळी परिस्थितीवर मात करत जळगाव जिल्ह्यातील शहादा तालुक्यातील जयनगर परिसरातील शेतकऱ्याने उपलब्ध असलेल्या पाण्याचे योग्य नियोजन व आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून केळी पिकात आंतरपीक म्हणून टरबूज लागवडीतून एकरी सुमारे सुमारे दोन लाखांचे उत्पन्न घेतले आहे.



विठोबा रामदास करंजे असे या शेतकऱ्याचे नाव असून, ते शहादा तालुक्यातील जयनगर येथील रहिवासी आहेत. शहादा तालुक्यात दुष्काळी परिस्थिती असताना पाण्याचे योग्य नियोजन करून, विठोबा यांनी जानेवारी व फेब्रुवारी महिन्यात तीन टप्प्यामध्ये केळी पिकात आंतरपीक म्हणून टरबुजाची लागवड केली. तीन टप्प्याच्या लागवडीतून अडीच-अडीच महिन्यात एकूण लागवडीपैकी दोन टप्प्यांमध्ये चांगले उत्पन्न मिळाले आहे. एकरी पावणे दोन ते दोन लाखांचे उत्पन्न त्यांना टरबूज पिकातून मिळाले आहे.

आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर

जयनगरसह परिसरात अनेक शेतकऱ्यांना दुष्काळी परिस्थिती असल्याने, पिकांना पाणी पुरविणे जिकिरीचे जात आहे. मात्र, विठोबा यांच्या कूपनलिकेला आणि विहिरीला चांगले पाणी आहे. त्यामुळे त्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि पाण्याचे योग्य नियोजन करून केळी पिकामध्ये आंतरपीक म्हणून टरबूज लागवड करून लाखो रुपयांचे उत्पादन घेतले आहेत. संकरित बियाण्याचा वापर करून केळी पिकात ठिबक सिंचनाच्या साहाय्याने आंतरपीक म्हणून लावलेल्या टरबुजासाठी रासायनिक खत व औषध फवारणीचे योग्य नियोजन केल्याने चांगले उत्पादन त्यांना मिळाले आहे.

किती मिळाले उत्पन्न?

केळी पिकात आंतरपीक म्हणून टरबुजाचे उत्पन्न घेण्याचे हे त्यांचे दुसरे वर्ष आहे. टरबुजाचे आंतरपीक घेतल्याने केळीवर कोणताच प्रतिकूल परिणाम होत नाही. वातावरणानुसार रासायनिक विद्राव्य खताचे तसेच औषध फवारणीचे योग्य नियोजन केल्यास अधिक उत्पन्न घेता येते. एकरी सरासरी टरबूज पिकाला ६० हजार रुपये भांडवल लागले असून, सरासरी १० ते १२ रुपये प्रती किलो दर मिळाला आहे. ज्यातून त्यांना एकरी पावणे दोन ते दोन लाखांचे उत्पन्न त्यांना टरबूज पिकातून मिळाले आहे. असे शेतकरी विठोबा रामदास करंजे सांगतात.

मराठवाडा, विदर्भात शेतकऱ्यांना दहा हजार गायी-म्हशी मिळणार!

मराठवाडा व विदर्भात दूध व्यवसायाला प्रोत्साहन देण्यासाठी प्रत्येक गावात 'एक सहकारी दूध संस्था' सुरू करण्यात येणार आहे. त्यानुसार राज्य सरकारकडून शेतकऱ्यांना अनुदानावर दहा हजार गायी व म्हशी देण्यात येणार आहे. दोन वर्षांत मराठवाडा व विदर्भात गावपातळीवर एकाही सहकारी प्राथमिक दूध संस्थेची स्थापना झालेली नाही. हे राज्याच्या पशुपालन विभागाच्या लक्षात आल्यानंतर आता या दोन्ही प्रशासकीय विभागांचा दूध उत्पादनातील अनुशेष भरून काढण्यासाठी पशुपालन विभागाने कंबर कसली असल्याचे सांगितले जात आहे.

पश्चिम महाराष्ट्राप्रमाणे या विदर्भ-मराठवाडा विभागांत दूध व्यवसायाला वाव आहे. पण त्याचे नियोजन नसल्याचे पशुपालन विभागाच्या लक्षात आल्यानंतर याबाबत विशेष लक्ष देण्यास सुरुवात करण्यात आली आहे. त्यामुळे आता पहिल्यांदाच या दोन्ही विभागांमध्ये 'गाव तिथे सहकारी दूध संस्था' स्थापन करण्याची जबाबदारी पशुसंवर्धन विभागावर सोपवण्यात आली आहे. राज्याच्या दूध उत्पादनात विदर्भ व मराठवाड्यात केवळ प्रतिदिनी ३५ लाख लिटर उत्पादन होते. त्याच्या दुपटीपेक्षा अधिक दूध पश्चिम महाराष्ट्रात आहे. यासाठी राज्य सरकारने या दोन्ही विभागांवर अधिक लक्ष केंद्रित केले आहे. राज्य सरकारने अलीकडेच दुग्धविकास विभाग नुकताच पशुसंवर्धन विभागात विलीन करण्याचा निर्णय घेतला आहे. सरकारी दूध संघांचे अस्तित्व संपुष्टात आल्याने येथील कर्मचारी पशुसंवर्धन विभागात, तर काहींना इतर विभागात पाठवले जाणार आहे.

असे आहे राज्यातील जिल्हानिहाय दूध उत्पादन :

राज्यात प्रामुख्याने अहमदनगर २४.८९ लाख लिटर, कोल्हापूर २०.६९ लाख लिटर, पुणे १९.३९ लाख लिटर, सोलापूर १५.३५ लाख लिटर, सांगली ११.५५ लाख लिटर, नाशिक ९.१४ लाख लिटर, सातारा ९.०१ लाख लिटर, जळगाव ४.९७ लाख लिटर, धाराशिव ४.९५ लाख लिटर, बीड ३.७० लाख लिटर, संभाजीनगर ३.५९ लाख लिटर, लातूर ३.१५ लाख लिटर, नांदेड ३.०२ लाख लिटर, धुळे २.०९ लाख लिटर, अमरावती २.०६ लाख लिटर, बुलढाणा १.८७ लाख लिटर, नागपूर १.८६ लाख लिटर दूध उत्पादन होते. जालना १.६७ लाख लिटर, भंडारा १.४० लाख लिटर, परभणी- १.३५ लाख लिटर, यवतमाळ १.३४ लाख लिटर, पालघर १.३० लाख लिटर, ठाणे १.२९ लाख लिटर, रायगड १.०१ लाख लिटर, गोंदिया १.०० लाख लिटर, हिंगोली १.०० लाख लिटर, अकोला ०.९८ लाख लिटर, नंदुरबार ०.९५ लाख लिटर, वर्धा ०.९३ लाख लिटर, चंद्रपूर ०.७० लाख लिटर, रत्नागिरी ०.६९ लाख लिटर, वाशिम ०.६६ लाख लिटर, गडचिरोली ०.४५ लाख लिटर, सिंधुदुर्ग ०.४३ लाख लिटर, मुंबई ०.२० लाख लिटर दूध उत्पादन ( ) होते.

गायींमध्ये होणार 'मसल प्रिंट' तंत्रज्ञानाचा वापर!

असा वापर करणारे महाराष्ट्र पहिले राज्य

पुणे: जनावरांची ओळख पटवण्यासाठी आणि त्यांच्या माहितीचा मागोवा ठेवण्यासाठी महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ यांनी आधुनिक 'मसल प्रिंट' तंत्रज्ञानाचा वापर करणार आहे. या तंत्रज्ञानाचा प्रायोगिक वापर राज्यातील ३० हजार गायींवर केला जाणार असल्याची माहिती मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सतीश राजू यांनी दिली.

सध्या जनावरांची ओळख पटवण्यासाठी कानात टॅग लावले जातात. मात्र हे टॅग कधीकधी हरवू शकतात किंवा खराब होऊ शकतात. यामुळे जनावरांची माहिती मिळवणे कठीण होते. 'मसल प्रिंट' तंत्रज्ञान या समस्येवर उपाययोजना करते. या तंत्रज्ञानाद्वारे, जनावराच्या नाकाजवळील काळ्या भागाचा स्कॅन घेऊन त्यावर माहिती नोंदविली जाते. ही माहिती विशिष्ट स्कॅनरद्वारे वाचली जाऊ शकते. जनावराची जात, वय, लिंग, आरोग्य इतिहास आणि इतर माहिती 'मसल प्रिंट' मध्ये समाविष्ट असू शकते. डॉ. राजू यांनी सांगितले की, ''हे तंत्रज्ञान जनावरांची चोरी आणि तस्करी रोखण्यास मदत करेल. तसेच, पशुधन विकास कार्यक्रमांचे प्रभावी अंमल बजावणीसाठीही ते उपयुक्त ठरेल.'' 'मसल प्रिंट' तंत्रज्ञानाचा वापर करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य बनणार आहे. या तंत्रज्ञानासाठी केंद्र सरकारने ईव्हर्स कंपनीसोबत करार केला आहे.

या तंत्रज्ञानाचे फायदे :

जनावरांची अचूक आणि सहज ओळख करता येईल. कानातील टॅग गमावल्यासही माहिती उपलब्ध होईल. जनावरांची चोरी आणि तस्करी रोखण्यास उपयुक्त. तंत्रज्ञान. पशुधन विकास कार्यक्रमांचे प्रभावी अंमलबजावणी करता येईल. जनावरांच्या आरोग्य व्यवस्थापनात सुधारणा करता येईल. 'मसल प्रिंट' तंत्रज्ञान हे पशुधन व्यवस्थापनात क्रांती घडवून आणण्याची क्षमता असलेले एक आधुनिक तंत्रज्ञान आहे. महाराष्ट्रात या तंत्रज्ञानाचा वापर केल्याने जनावरांची माहिती व्यवस्थापन सुधारण्यास आणि पशुधन क्षेत्रात अनेक फायदे मिळण्यास मदत होईल.

दिन विशेष

जागतिक दिवस
जागतिक ग्रंथ तथा रचनास्वायत्त दिन

महत्वाच्या घटना

- १६७४ : भोर-वाई प्रांतातील केंजळगड शिवाजी महाराजांनी स्वारी करुन जिंकला.
- १७१७ : खंडेराव दाभाडे यांनी अहमदनगर येथे मोगलांचा पराभव केला.
- १८०० : अमेरिकेतील महाप्रचंड अशा लायब्ररी ऑफ काँग्रेसची स्थापना झाली. हे जगातील सर्वोत्तम ग्रंथालय आहे.
- १९६७ : वेळेवर पॅराशूट न उघडल्यामुळे व्लादिमिर कोमारोव्ह हा मरण पावणारा पहिला अंतराळवीर ठरला.
- १९६८ : मॉरिशस संयुक्त राष्ट्रांचा सदस्य बनला.
- १९७० : गाम्बिया प्रजासत्ताक बनले.
- १९९० : डिस्कव्हरी या अंतराळयानातून हबल ही दुर्बिण सोडण्यात आली.
- १९९३ : इंडियन एअरलाइन्सच्या फ्लाईट ४२७ या दिल्लीहून श्रीनगरला जाणाऱ्या विमानाचे ३ अतिरेक्यांनी अपहरण केले. ब्लॅक कॅट कमांडोजनी केलेल्या कारवाईत तिन्ही अतिरेकी ठार झाले व सर्व १४१ प्रवाशांची सुखरुप मुक्तता झाली.
- २०१३ : ढाका, बांगलादेश मध्ये इमारत कोसळून ११२९ जणांचा बळी गेला आणि २५०० जण जखमी झाले.

जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

- १८९६ : रघुनाथ वामन दिघे - रसाळ लेखन करणारे कादंबरीकार. 'पाणकळा', 'सराई', 'पड रे पाण्या', 'आई आहे शेतात', 'गानलुब्धा', 'मृगनयना' वगैरे त्यांच्या कादंबर्या अतिशय गाजल्या. (मृत्यू: ४ जुलै १९८०)
- १८८९ : सर स्टॅफोर्ड क्रिप्स - इंग्लिश राजकारणी (मृत्यू: २१ एप्रिल १९५२)
- १९१० : राजा परांजपे - चित्रपट दिग्दर्शक, निर्माते आणि अभिनेते (मृत्यू: ९ फेब्रुवारी १९७९)
- १९२९ : राजकुमार - कन्नड चित्रपट अभिनेता व गायक (मृत्यू: १२ एप्रिल २००६)
- १९३४ : पद्मभूषण व ज्ञानपीठ पुरस्कार सन्मानित भारतीय लेखक, पत्रकार, वक्ते, चित्रपट-निर्माता, समीक्षक आणि कार्यकर्ते डी. जयकांत यांचा जन्मदिन
- १९४१ : उर्दू अकादमीचे माजी अध्यक्ष अजीज कुरेशी यांचा जन्मदिन.
- १९५६ : पद्मश्री, पद्मभूषण व पद्मविभूषण पुरस्कार सन्मानित भारताच्या छत्तीसगड राज्यातील पहिल्या महिला कलाकार आणि गायिका तीजनबाई यांचा जन्मदिन
- १९७० : डॅमियन फ्लेमिंग - ऑस्ट्रेलियन क्रिकेटपटू
- १९७३ : सचिन तेंडुलकर - महान क्रिकेटपटू, भारतरत्न.

मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

- १९४२ : मास्टर दीनानाथ मंगेशकर - शास्त्रीय व नाट्यसंगीत गायक व अभिनेते (जन्म: २९ डिसेंबर १९००)
- १९४४ : दूरदर्शी, परोपकारी, भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे नेता आणि महात्मा गांधी काशी विद्यापीठाचे संस्थापक तसचं, 'दैनिक आज' या हिंदी वृत्तपत्राचे संस्थापक शिवप्रसाद गुप्त यांचे निधन.
- १९६० : लक्ष्मण बळवंत तथा अण्णासाहेब भोपटकर - नामवंत वकील, महाराष्ट्र मंडळाचे एक संस्थापक, केसरीचे संपादक आणि हिंदू महासभेचे नेते (जन्म: १८६०)
- १९७२ : जामिनी रॉय - चित्रकार (जन्म: ११ एप्रिल १८८७)
- १९७४ : रामधारी सिंह 'दिनकर' - देशभक्त व हिन्दी साहित्यिक (जन्म: २३ सप्टेंबर १९०८)
- १९९४ : शंतनुराव किर्लोस्कर - पद्मभुषण पुरस्कार विजेते उद्योगपती, किर्लोस्कर उद्योगसमूहाचे आधारस्तंभ (जन्म: २८ मे १९०३)
- १९९९ : सुधेन्दू रॉय - चित्रपट व कला दिग्दर्शक (जन्म: १९२१)
- २००९ : प्रख्यात भारतीय लेखक, कवी व वक्ता तसचं, धार्मिक नेता महात्मा रामचंद्र वीर यांचे निधन.
- २०११ : सत्यनारायण राजू ऊर्फ 'सत्य साईबाबा' - आध्यात्मिक गुरू (जन्म: २३ नोव्हेंबर १९२६).
- २०१४ : भारतीय राजकारणी शोभा नेगी रेड्डी यांचे निधन. (जन्म: १६ नोव्हेंबर १९६८).

जाणून घ्या कार्बन क्रेडिट शेती

हवामान बदलाच्या समस्येवर मात करण्यासाठी जगभरात प्रयत्न सुरू आहेत. याच प्रयत्नांचा एक भाग म्हणून कार्बन क्रेडिटची संकल्पना विकसित झाली आहे. कार्बन क्रेडिट हे एक प्रमाणपत्र आहे जे एका टन कार्बन डायऑक्साइड किंवा समतुल्य हरितगृह वायू उत्सर्जन कमी करण्याचे प्रतिनिधित्व करते. कार्बन क्रेडिट शेतीमध्ये, शेतकरी अशा पद्धतींचा अवलंब करतात ज्यामुळे वातावरणातील कार्बन डायऑक्साइड शोषून घेण्यास मदत होते. या पद्धतींमध्ये

वृक्ष लागवड: झाडे वाढत असताना ते वातावरणातील कार्बन डायऑक्साइड शोषून घेतात.

जैविक शेती : रासायनिक खते आणि कीटकनाशकांचा वापर कमी करून जमिनीची सुपीकता वाढवणे.

शाश्वत शेती पद्धती : पाणी आणि ऊर्जेचा काटकसरीने वापर, मातीची धूप रोखणे इत्यादी. या पद्धतींचा अवलंब करून शेतकरी कार्बन क्रेडिट मिळवू शकतात. हे क्रेडिट नंतर ते कार्बन उत्सर्जन कमी करण्यासाठी प्रयत्नशील असलेल्या कंपन्या आणि संस्थांना विकू शकतात.

कार्बन क्रेडिट शेतीचे फायदे : शेतकऱ्यांसाठी नवीन उत्पन्नाचा स्रोत. हवामान बदलाशी लढण्यास मदत. जमिनीची सुपीकता वाढवणे. पाणी आणि ऊर्जेचा बचत. शाश्वत शेतीला प्रोत्साहन.

कार्बन क्रेडिट शेतीसाठी काय आवश्यक आहे?

शेतकऱ्यांनी एकत्र येऊन एक गट तयार करणे आवश्यक आहे. या गटाला कार्बन क्रेडिट प्रकल्पासाठी नोंदणी करणे आवश्यक आहे. प्रकल्पाचे नियोजन आणि अंमलबजावणीसाठी तज्ञांची मदत घेणे आवश्यक आहे. कार्बन क्रेडिट शेती ही शेतकऱ्यांसाठी एक नवीन आणि फायदेशीर संकल्पना आहे. हवामान बदलाशी लढण्यास मदत करण्यासोबतच शेतकऱ्यांच्या उत्पन्नातही वाढ करू शकते.

संविधानाला नख लावण्याचा कोणी प्रयत्न केला तर मी आधी रस्त्यावर उतरेल –पंकजाताई मुंडे

आनंद शिंदेंच्या संगीत रजनीला बीडकरांचा उदंड प्रतिसाद; पंकजाताई व भीमप्रेमी जनतेनी केले राजेंद्र मस्केंचे कौतुक

बीड । प्रतिनिधी

संविधान महामानवाने दिलेले आहे. तो बदलण्याचा अधिकार या जगात कोणालाच नाही. जर कोणी नख लावायचा प्रयत्न केला तर पंकजा मुंडे तुमच्या आधी रस्त्यावर उतरेन. असे आश्वासन भाजपा राष्ट्रीय सचिव आणि बीड लोकसभेच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांनी बीड येथे शिव फुले आंबेडकर जयंती निमित्त उपस्थित भीमप्रेमी नागरिकांना देत पुढे म्हणाल्या कि, छत्रपती शिवाजी महाराज ज्यांनी त्यावेळी जाणीव करून दिली कि हि माती आपली आहे ही धरती आपली आहे. आणि परकीय आक्रमणाच्या विरोधात लढून स्वराज्य स्थापन करून, या मातीत स्वातंत्र्याचे बीजारोपण केले. तर ज्यांनी स्वातंत्र्यात मिळाल्यानंतर या देशात राहणारा प्रत्येक माणूस कायद्याला समान आहे. हे तत्व देऊन देशाला सुंदर परिपूर्ण सहिष्णू संविधान दिले. ज्यांनी क्रांतीची ज्योत आणि क्रांतीचा सूर्य बनण्याचे काम केले. शिक्षणाचा महिलांना समान अधिकार दिला. अशा सर्व महामानवांना अभिवादन केले. भगवा, पिवळा, नीळा, हिरवा सर्व झेंडे एक व्हावे. आणि त्याचा रंग पांढरा व्हावा. समाजात असे चित्र असावे, समाजामध्ये शांती स्थापन व्हावी. अशी सदिच्छा व्यक्त केली.

गतवर्षी प्रमाणे भाजपा जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्या संकल्पनेतून विश्ववंदनीय छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिराव फुले, विश्वरत्न, भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्ताने शिव, फुले, आंबेडकर यांच्या संयुक्तिक जयंती महोत्सवानिमित्त ख्यातनाम भीमगीत गायक सम्राट आनंद शिंदे यांचा संगीत रजनी कार्यक्रम छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगन बीड येथे आयोजित करण्यात आला होता. भाजपा राष्ट्रीय सचिव पंकजाताई मुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झालेल्या या सांस्कृतिक कार्यक्रमास भीम प्रेमी जनता व रसिक बीडकरांनी उदंड प्रतिसाद दिला. हजारोंच्या संख्येत उपस्थित असलेला अवघा भीमसागर ख्यातनाम गायक आनंद शिंदे यांच्या सुरेल सुरांनी मंत्रमुग्ध झाला.

महापुरुषांच्या जयंतीनिमित्ताने महापुरुषांच्या

सामाजिक समतेचा विचार समाजात रुजवण्यासाठी महोत्सव –राजेंद्र मस्के

विचारांचे जागरण व्हावे. त्यांचे चरित्र आणि कार्य युवा पिढीपर्यंत पोहचले पाहिजे. त्यांच्या विचाराची ओळख सुजाण नागरिकांना झाली पाहिजे. या उदात्त हेतूने हा संयुक्तिक जयंती महोत्सव साजरा करत आहोत. या महोत्सवातून स्वातंत्र्य समता, बंधुता आणि सामाजिक समतेचा विचार समाजात निश्चितपणे रुजेल असा विश्वास व्यक्त करून राजेंद्र मस्के यांनी महापुरुषांच्या जयंतीनिमित्त सर्वांना शुभेच्छा दिल्या.

यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल दादा जगताप, ऍड. सर्जेराव तांदळे, नवनाथ शिराळे, रिपाई जिल्हा सचिव विलास जोगदंड, अशोक वाघमारे, शिवसंग्रामचे ऍड राहुल मस्के, विक्रांत हजारी, सुनील सुरवसे, डॉ.लक्ष्मण जाधव, अजय सवाई, ज्योतिबा नन्नवरे,रमेश चव्हाण, बाप्पासाहेब घुगे, इर्शाद भाई, तुरुकमारे सर, सोमनाथराव माने, बालाजी पवार, मदन मस्के, अनिल चांदणे, अभय वणवे, दुष्यंत डोंगरे, पाल सिंगनकर काका, आदित्य सारडा, दादासाहेब गिरी, राजू शहाणे, दत्ता परळकर, कल्याण काका आखाडे, नानासाहेब शिंदे, शरद दुग्गड, संभाजी सुर्वे, उत्रेश्वर घोडके, कपिल सौदा, विलास जोगदंड, संग्राम बांगर, अमोल वडतीले, नितीन फड, जयश्रीताई मस्के, संध्याताई राजपूत, मीराताई गांधले, संगीता धसे, छायाताई मिसाळ, प्रीतताई कुकडेजा, शीतलताई राजपूत,आदी मान्यवर पत्रकार, व्यापारी, भाजपा व विविध राजकीय, सामाजिक विविध क्षेत्रातील तसेच पत्रकार बांधवांसह रसिक बीडकर बांधव मोठ्या संखेने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्र संचलन मारुतीराव तीपाले यांनी केले.

सर्व दुःखावर मात करण्यासाठी लेखक साहित्य लिहितो – आसाराम लोमटे

माजलगाव । प्रतिनिधी

कष्टाचा,श्रमाचा, साहित्याचा अतिशय जवळचा संबंध आहे.सर्व दुःख मात करण्यासाठी लेखक साहित्य लेखन करतो,असे प्रतिपादन १५ व्या शिवार साहित्य संमेलनाचे उद्घाटक प्रसिद्ध साहित्यिक आसाराम लोमटे यांनी केले.यावेळी व्यासपीठावर संमेलनाध्यक्ष प्रा.डॉ.अनिलकुमार साळवे,पूर्वाध्यक्ष राही फपाळ, स्वागताध्यक्ष जगदीश पोपळे, मसापचे अध्यक्ष मुकुंदराज सोळंके, प्रा.स्नेहल पाठक, प्रा.डॉ.भाऊसाहेब राठोड,किशोर गुंजकर,प्रभाकर साळेगावकर यांची उपस्थिती होती.

यावेळी पुढे बोलताना आसाराम लोमटे म्हणाले की, साहित्याची अनुभूती शब्दांच्या माध्यमातून होते. लेखनातील काही जागा वाचकांनी भरून काढाव्यात, अशी अपेक्षा असते. साहित्यिक समाजातील एकोपा,सदभाव, विवेक,शहाणपण साहित्याच्या माध्यमातून टिकवतात. अंतिमतःलेखन माणसाच्या

भलेपणासाठी असते.साहित्याने इतिहास घडवला आहे.साहित्याची ताकद माणसाला धीर देते.साहित्य सर्व दुःखाचे निराकरण करते. यावेळी बोलताना संमेलनाध्यक्ष प्रा. डॉ.आसाराम लोमटे म्हणाले की, शिक्षणाच्या प्रवाहातील मोठा अडथळा आजचा अभ्यासक्रम आहे.पदव्या घेऊन तरूण वणवण फिरत आहेत. सध्याच्या शिक्षण व्यवस्थेवर लेखकांनी बोलायला पाहिजे. यावेळी पूर्वाध्यक्ष राही फपाळ यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक मनोज सोळंके यांनी केले. सूत्रसंचालन स्मिता लिमगावकर यांनी केले तर आभार खेलबा काळे यांनी मानले.यावेळी प्रा. डॉ.वैशाली गोस्वामी,विलास सिंदगीकर,प्रा. संगीता जाधव, रामकिशन सोळंके, बालासाहेब झोडगे, प्रा.डॉ.उमेश साडेगावकर,प्रा. हिरामण डावरे,गौरी देशमुख, डॉ.प्रज्ञा जोशी,विशाल वायाळ, बालाप्रसाद चव्हाण,मोहन राठोड, कैलास सोळंके,सखाराम जोशी,वसंत पाटील,जीवन पांचाळ, चंद्रशेखर साखरे,दत्तात्रय सोळंके,मिनाक्षी निळेकर,प्रतिभा थिगळे,सोमेश पोपळे,रोमेश पोपळे यांच्यासह साहित्य प्रेमींची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

आज हनुमंतगाव येथे ह.भ.प.बबन महाराज यांचे काल्याचे कीर्तन

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील हनुमंतगाव येथे श्रीराम जन्मोत्सव व हनुमान जन्मोत्सवनिमित्त सालाबादप्रमाणे याही वर्षी वै.संत मदन महाराज बिहाणी यांच्या कृपा आशीर्वादाने व ह.भ.प.आजिनाथ महाराज झांबरे यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण व अखंड हरिनाम सप्ताह दि.१७ ते २४ एप्रिल २०२४ या कालावधीत आयोजित करण्यात आला होता.दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी मेहेर ज्वेलर्स सोन्या,चांदीचे आष्टीचे व्यापारी स्व.पु.प्यारीबाई गोकुळदासजी मेहेर आणि स्व.जयकुमार मेहेर यांचे स्मरणार्थ संतोषशेठ मेहेर,विजशेठ मेहेर यांच्या मेहेर ज्वेलर्सच्यावतीने आज दि.२४ एप्रिल रोजी सप्ताहातील महाप्रसादाची महापंगत होत आहे.या कीर्तनाचा व महाप्रसादाचा भाविकांनी लाभ घ्यावा असे आवाहन मेहेर बंधुंनी केले आहे.

व्यासपीठ चालक म्हणुन ह.भ.प.ज्ञानेश्वर महाराज पारखे,ह.भ.प. झुंबर महाराज,श्रीरंग मदने हे काम पाहत आहेत.या सप्ताहात ह.भ.प. शिवाजी महाराज कोकणे, ह.भ.प.सुनील महाराज झांबरे, भागवताचार्या ह.भ.प.



प्रतिक्षाताई महाराज करडुळे (बीड) ,ह.भ.प. संजिवनीताई महाराज शिगाडे,ह.भ.प.नागनाथ महाराज काळे,ह.भ.प. यशवंत महाराज कदम

ह.भ.प.पांडुरंग महाराज यांचे हरिकीर्तन झाले. आज बुधवार दि.२४ एप्रिल २०२४ रोजी सकाळी १० ते १२ यावेळेत संत मदन महाराज देवस्थानचे अध्यक्ष ह.भ.प.बबन महाराज बहिरवाल यांचे काल्याचे किर्तन होणार आहे.त्यानंतर मेहेर बंधु यांच्यावतीने महाप्रसाद वाटप होणार आहे. हनुमंतगाव येथील हनुमान सेवा मंडळ, समस्त गांवकरी मंडळी यांनीही उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

माजलगाव येथे सर्व धर्मीय बांधवांचा ईद मिलन व मस्जिद परिचय कार्यक्रम यशस्वीरीत्या संपन्न

माजलगाव । प्रतिनिधी

आपल्या सभोवतालच्या गोरगरिबांची मदत करा,त्यांच्या समस्यांचे निराकरण करा,आपल्या आनंदाच्या क्षणात सण उत्सवात सर्वांना सहभागी व सामील करून घ्या अशी इस्लामची शिकवण आहे.प्रेषित मोहम्मद यांनी चौदाशे वर्षांपूर्वी मस्जिदी मधून सर्व समाज सुधारण्याचे उपक्रम राबविले,अक्षरशा छोट्यांसाठी मोठ्यांसाठी उजळणी वर्ग मस्जिदीमध्ये भरायचे !मस्जिद मानवाला निर्मात्याशी व मानवाला मानवाशी जोडण्याचे केंद्र आहे असे प्रतिपादन प्रख्यात इस्लामिक स्कॉलर प्राध्यापक वाजिद अली खान (नाशिक) यांनी माजलगावच्या मस्जिद अब्दुल गफुर येथे सर्व धर्मियांसाठी आयोजित केलेल्या ईद-मिलन कार्यक्रमात केले.

या कार्यक्रमास उपविभागीय अधिकारी श्री गौरव इंगोले व पोलीस उपअधीक्षक श्री डॉ. बी.धीरज कुमार हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

सदर मस्जिद परिचय व ईद

मिलन कार्यक्रमाची सुरुवात कुराण पठणाने करण्यात आली.या वेळी डी वाय एस पी डॉ धीरज कुमार बच्चू म्हणाले की जमाते इस्लामी हिंद माजलगाव यांचे मी आभार मानतो की त्यांनी हा सामाजिक सलोख्याचा व शांतीचा संदेश देणारा कार्यक्रम आयोजन करून सर्व धर्मीय बांधवांना आमंत्रित केले,मी पहिल्यांदाच अशा सामाजिक कार्यक्रमात आलो मला खूप छान वाटले.आज मुस्लिम समाजाने शिक्षणासाठी अजून पुढाकार घेऊन प्रयत्न करणे आवश्यक आहे कारण '' पढ़ने से ही दिमाग की बत्ती जलती है''.असे म्हटले या वेळी उपविभागीय अधिकारी गौरव इंगोले यांनी सांगितले की विद्यार्थ्यांनी आपले एक ध्येय निश्चित करून त्यासाठी मेहनत केली पाहिजे,मुस्लिम समाज रोजगारासाठी चांगली मेहनत घेतो चांगले नियोजन करून माहिती मिळवून उत्तम प्रकारे बिजनेस होऊ शकतो.समाजात सदभावना वाढली पाहिजे त्यामुळे समाजात एकात्मता,बंधूंभाव शांतता वाढण्यास मदत मिळते. कार्यक्रमाच्या सुरुवातीस जमाती इस्लामी हिंद माजलगावचे शहराध्यक्ष माजेद खान यांनी प्रास्ताविक करत कार्यक्रमाची रूपरेषा व उद्देश स्पष्ट केले.तसेच जमाते इस्लामी हिंद देशभरात करत असलेले समाजसेवेचे कार्य नमूद केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मारुफ इनामदार यांनी केले.

दिगंबर मोरे यांचे निधन

माजलगाव । प्रतिनिधी

बहुजन विकास मोर्चाचे ज्येष्ठ नेते तथा बाजार समितीचे उपसभापती श्रीहरी नाना मोरे यांचे वडील का. दिगंबर किसनराव मोरे यांचे वृद्धापकाळाने दि. २२ एप्रिल सोमवार रोजी रात्री निधन झाले.

त्यांच्या पार्थिव देहावर पुरुषोत्तमपुरी येथे दि.२३ एप्रिल मंगळवार रोजी सकाळी ९:०० वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात चार मुले, एक मुलगी, सून, नातवंडे, पतवंडे असा मोठा परिवार आहे.

अखंड हरिनाम सप्ताहाची भव्यदिव्य सांगता

माजलगाव । प्रतिनिधी

शहरापासून जवळच असलेल्या मनुर येथील अखंड हरीनाम सप्ताहाची सांगता मोठ्या दिमाकदार व भव्यदिव्य स्वरूपात काल झाली तालुक्यातील मौजे मनुर येथे मागच्या अनेक वर्षांपासून या अखंड हरीनाम सप्ताहाचे आयोजन गाववकाऱ्यांच्या वतीने केले जाते या वर्षी ह भ प सोमेश्वर महाराज कर्डिले यांचे मार्गदर्शन लाभले सप्ताहाचे हे २० वे वर्ष आहे.

दि १७ ते २३ एप्रिल दरम्यान या अखंड हरीनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते या दरम्यान महाराष्ट्रातील अनेक नामवंत महाराजांचे कीर्तन या ठिकाणी झाली तर मनुर चे प्रसिद्ध कथाकार भागवताचार्य ह .भ.पा. सोमेश्वर महाराज कर्डिले यांच्या श्री मुखातून ही कथा ऐकताना भाविक भक्त

अक्षरशः तल्लीन होऊन कथा श्रावण करत असत आज या कथेची सांगता झाली या वेळी गावातील महिला , मुली ,ग्रामस्थांनी पारंपरिक वस्त्र परिधान करून वाजत गाजत संपूर्ण गावातून ग्रंथ दिंडीत काढण्यात आली त्यानंतर श्री ह.भ. पा. नारायण महाराज काळे (आळंदी देवाची) यांचे भव्य असे काल्याचे किर्तन संपन्न झाले व गावकऱ्यांच्या वतीने सामुदायिक महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

प्राथमिक उर्दु शाळा अरब गल्ली पाटोदा येथे शाळा पूर्वतयारी मेळाव्याचे आयोजन

पाटोदा । प्रतिनिधी

स्टार प्रकल्प अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२४ – २५ करिता इयत्ता पहिली मध्ये दाखल होणाऱ्या बालकांसाठी शाळा पूर्व तयारी अभियान मेळावा क्रमांक ०१ हा कार्यक्रम जिल्हा परिषद प्राथमिक शाळा उर्दु अरब गल्ली पाटोदा येथे आज दिनांक २३/०४/२०२४ रोजी घेण्यात आला. पाटोदा येथील जिल्हा परिषद प्राथमिक उर्दु शाळा आरबगल्ली ता.पाटोदा जि.बीड येथे मेळाव्याचे आध्यक्षस्थानी जेष्ठ नागरिक शेख महेबुबभाई.हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून सय्यद मुसाभाई, पत्रकार हमीदखान पठाण,शेख युनुस,शेख राजु भाई

,अंगणवाडी सेविका मंगल जावळे,मदतणीस हिराबाई अडागळे, उपस्थित होते. यावेळी शिक्षक शेख इम्रान इस्माईल व शालेय व्यवस्थापन समिती यांनी येणाऱ्या मान्यवरांचे व इयत्ता पहिली प्रवेश पात्र विद्यार्थ्यांचे, यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी मेळाव्यात सात टेबल लावण्यात आले होते . पहिला टेबल ला नाव नोंदणी करण्यात आली, दुसऱ्या टेबल ला शारीरिक विकास यात मुलांना खेळ घेण्यात आले, तिसऱ्या टेबल ला बुद्धिक विकाससा. बद्दल उपक्रम घेण्यात आले, टेबल क्र.४ या मध्ये सामाजिक आणि भावनात्मक विकाससा बद्दल माहिती देण्यात आली, टेबल क्र. ५ या मध्ये भाषा विकास सा बद्दल मुलाकडून माहिती घेण्यात आली, टेबल क्र . ६.गणनपुर्व तयारी मुलाकडून घेण्यात आली, नंतर समुपदेशन करण्यात आले व मुलांना साहित्य वाटप करण्यात आले.

दिंद्रूडच्या आठवडी बाजारात पाणपोई सुविधा

दिंद्रुड । प्रतिनिधी

उन्हामुळे अंगाची लाही लाही होत असलेल्या बजारकरू नागरिकांसाठी ग्रामपंचायत सदस्य अतुल चव्हाण यांच्या वतीने पाणपोईची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. वटवृक्षाची सावली व थंडगार शुद्ध फिल्टरयुक्त पाणी बाजारहाट करण्यासाठी आलेल्या महिला व पुरुषांची तहान भागवत आहेत.

दर रविवारी दिंद्रुड येथे आठवडी बाजार भरतो, उन्हाळ्याच्या तीव्र ज्वाला,वाढती उष्णता व पाणीटंचाई यावर उपाय म्हणून दिंद्रुड चे ग्रामपंचायत सदस्य अतुल चव्हाण यांनी बाजार तळावरील वटवृक्षाच्या शितल छायेत पाणपोईची सुविधा सुरु केली आहे. या पाणपोईचे उद्घाटन करण्यासाठी देवदूत प्रतिष्ठानचे अध्यक्ष बंडूजी खांडेकर, ग्रामपंचायत सदस्य राम उबाळे, अजिम शेख, ग्रामसेविका कुशाताई पोटभरे, रमेशराव कुलकर्णी, शंकर यादव, सिध्दार्थ मायंदळे, नागेश कानडे आदी उपस्थित होते. सदरील पाणपोईचा जवळपास वीस ते पंचवीस खेडेगावातून आलेल्या बजारकरूंना फायदा होणार आहे. या स्तुत्य उपक्रमाबद्दल ग्रा. प. सदस्य अतुल चव्हाण व त्यांच्या सहकाऱ्यांचे कौतुक होत आहे.

प्रत्येकाने डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे विचार आत्मसात करावेत -डॉ.राजेश इंगोले

अंबाजोगाई । प्रतिनिधी

भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य समाजातील प्रत्येकासाठी, प्रत्येक जातीधर्मासाठी अलौकिक होते. प्रत्येकाने डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे विचार आत्मसात करून करावेत. यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना समजून घेऊन प्रत्येकाने स्वतःच्या मन मस्तिष्कात डॉ.बाबासाहेब आंबेडकर जागृत करण्याची गरज आहे असे प्रतिपादन सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ तथा इंडियन मेडिकल असोसिएशनचे प्रदेश सहसचिव व सांस्कृतिक समितीचे अध्यक्ष डॉ.राजेश इंगोले यांनी केले.

पाटोदा येथे आयोजित डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात ते प्रमुख मार्गदर्शक व्याख्याते म्हणून बोलत होते. यावेळी व्यासपीठावर गावचे प्रमुख नागरिक अविनाश उगले, कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक बाळासाहेब देशमुख , आकाश देशमुख,

ग्रामपंचायत सदस्य गोविंद जामदार ग्रामपंचायत सदस्य धनराज पन्हाळे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरूवात डॉ.राजेश इंगोले यांच्या हस्ते पंचशील ध्वजारोहणाने झाली. यानंतर महापुरूषांच्या प्रतिमांना मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करत बौद्धचार्य धर्मराज सरवदे यांनी बुद्धीवंदना घेतली. पुढे बोलताना डॉ.राजेश इंगोले यांनी डॉ.आंबेडकरांना अपेक्षित समाज हा शिक्षित, स्वाभिमानी, पुरोगामी, व्यसनमुक्त, अंधश्रद्धा मुक्त विज्ञानवादी होता. दुर्दैवाने समाजात यासर्व गोष्टींना समजून घेण्याचा अभाव झाल्याने विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना अपेक्षित शासनकर्ती जमात ही संकल्पना प्रत्यक्षात येऊ शकली नाही. त्यामुळे समाजाने आता आपली सदसद्विवेकबुद्धी जागृत करून सामाजिक प्रवाहात पुढे येण्याचा प्रयत्न केला पाहिजे ही काळाची गरज असल्याचे मत व्यक्त केले. महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी समाजातील विविध जातीधर्मातील लोकांना, कष्टकरी लोकांना, दिन-दलितांना, स्त्रियांना गुलामीतून मुक्त करून माणूस म्हणून जगण्याची संधी उपलब्ध करून दिली हे त्यांचे अनंत उपकार आहेत त्यांची उतराई कधीच होऊ शकणार नाही या भावना व्यक्त करीत भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना जयंतीनिमित्त अभिवादन केले. पाटोदा येथील या जयंतीचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे या जयंती उत्सव समितीला कोणीही अध्यक्ष, उपाध्यक्ष नव्हते सर्व युवकांनी एकत्रित येऊन ही जयंती साजरी केली. गावातील युवक रत्नदीप सरवदे,सुरज गायकवाड, अक्षय कांबळे, महेश जोगदंड, सागर सरवदे, अक्षय जोगदंड, सुमित कांबळे यांनी ही अध्यक्ष विरहित नवसंकल्पना राबवित जयंती करीता परिश्रम घेत जयंती उत्सव साजरा करण्यात महत्वाची भूमिका पार पाडली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रत्नदीप सरवदे यांनी केले तर उपस्थितांचे आभार सुरज गायकवाड यांनी मानले.

देशाला महाशक्ती बनवायची असेल तर पंतप्रधान नरेंद्र मोदींशिवाय पर्याय नाही : पंकजाताई मुंडे

जिजाऊंच्या जन्मभूमीत संघर्षकन्येचं उत्स्फूर्त स्वागत : पंकजाताई मुंडेंच्या सभेला सिंदखेडराजात लोटली अलोट गर्दी

बुलढाणा । प्रतिनिधी

देशात शांतता प्रस्थापित करायची असेल, गरीबांचं कल्याण करायच असेल, जगात भारताला सर्वात मोठी आर्थिक शक्ती बनवायची असेल तर पंतप्रधान नरेंद्र मोदी शिवाय पर्याय नाही. गोरगरीब, वंचितांची पीडा मोदींनाच आहे. त्यामुळे नरेंद्र मोदींना तिसऱ्यांदा पंतप्रधान करण्यासाठी आणि बुलढाण्याचा सर्वांगीण विकास करण्यासाठी पुन्हा एकदा महायुतीचे उमेदवार प्रतापराव जाधव यांना प्रचंड मतांनी विजयी करावे. तुम्ही बुलढाण्याची जागा निवडून द्या ,बीड बरोबरच बुलढाण्याचा आवाज बनून मी काम करेल असा विश्वास भाजपा राष्ट्रीय सचिव पंकजाताई मुंडे यांनी दुसरबीड तालुका सिंदखेड राजा येथील जाहीर सभेत बोलताना व्यक्त केला.

बुलढाणा लोकसभा मतदारसंघाचे भाजपा महायुतीचे अधिकृत उमेदवार खा. प्रतापराव जाधव यांच्या प्रचारार्थ दुसरबीड तालुका सिंदखेडराजा येथे पंकजाताई मुंडे यांच्या जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सिंदखेडराजा परिसरातील नागरिकांनी सभेला अलोट गर्दी केली होती. दरम्यान मॉसाहेब जिजाऊंच्या जन्मभूमीत महाराष्ट्राची रणरागिणी व संघर्ष कन्या म्हणून ओळख असलेल्या पंकजाताई मुंडे यांचे उस्फुर्त स्वागत करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर उमेदवार प्रतापराव जाधव यांच्यासह पालकमंत्री डॉ. राजेंद्र शिंगणे,आमदार संजय रायमुलकर,आमदार श्वेता महाले,माजी आमदार तोतारामजी कायंदे,डॉ. शशिकांत खेडेकर, विजयराज शिंदे, आशाताई गोरे आदींसह लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, महायुतीतील घटक पक्षांचे नेतेगण उपस्थित होते.

बुलढाण्याची जागा निवडून द्या: बीडबरोबरच मी बुलढाण्याचा आवाज बनून काम करेल

प्रतापराव जाधवांना विजयी करा : विकासाची जबाबदारी माझी

पुढे बोलताना पंकजाताई मुंडे म्हणाल्या, सिंदखेड राजा परिसराशी आपले वर्षांनुवर्षाचे ऋणानुबंध आहेत. लोकनेते गोपीनाथराव मुंडे लहानपणी मला नेहमी म्हणायचे की पंकजाताई मी तुम्हाला सिंदखेडराजाला उभे करणार आहे. एवढा विश्वास आणि प्रेम या परिसराबद्दल मुंडे साहेबांच्या मनात होता. मी दर वेळा आवर्जून या परिसरात सातत्याने येत असते. राज्यात मंत्रिमंडळात काम करत असताना परळीच्या बरोबरीने विकासाची कामे सिंदखेडराजा या परिसराला मी दिलेली आहेत. परळी एवढेच प्रेम माझे सिंदखेड राजा परिसरावर आहे. आणि या परिसरातील जनतेचेही तितकेच निरपेक्ष प्रेम माझ्यावर आहे. हे अतूट नाते असून हे अखंडित सुरू राहावे अशीच माझी अपेक्षा आहे. त्यामुळेच मी स्वतः उमेदवार असताना आणि नेहमीप्रमाणेच कठीण अशी लढाई लढत असताना देखील आवर्जून या सभेला आले आहे. अनेक वर्ष तुम्हाला या ठिकाणी धनुष्यबाणावर मतदान मागण्यासाठी मुंडे साहेबांचा परिवार म्हणून मी आलेली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे हात बळकट करण्यासाठी आपल्याला प्रचंड मतांनी एक एक शिलेदार दिलेला पाठवायचा आहे. तिसऱ्यांदा पंतप्रधान नरेंद्र मोदी होणार आहेत. तेव्हा त्यांना मत देणारा एक हात बुलढाण्यात निश्चित जाणार आहे. प्रतापराव जाधव निवडून गेल्यानंतर या सगळ्या मतांचा सन्मान करतील आणि सिंदखेडच्या विकासापासून त्यांच्या कार्याची सुरुवात करतील असा मला पूर्ण विश्वास आहे.देशाला जगातली सगळ्यात मोठी आर्थिक शक्ती बनवायचे असेल तर प्रधानमंत्री नरेंद्र मोदींशिवाय पर्याय नाही. मोदीजींना प्रधानमंत्री करायचं आहे .म्हणून कितीही वेळ देऊन मी ते कष्ट करायला तयार आहे. त्यासाठी प्रतापराव जाधव यांना विजयी करा आणि आपल्या विकासाला एक नवीन दिशा एक नवी उमेद आपण मिळवून द्या असे आवाहन पंकजाताई मुंडे यांनी यावेळी केले.

मातृतिर्थाची माती कपाळी लावली..

मॉसाहेब जिजाऊ यांच्या जन्मभूमीतून सिंधखेडराजा मातृतिर्थावरून पंकजाताई मुंडे यांनी खास माती आणायला लावली आणि मात्तृतीर्थाची ही माती कपाळी लावत आपल्याला एक प्रचंड ऊर्जा नेहमीच मिळते अशी भावना व्यक्त केली. मातृतीर्थावून आणलेली ही माती मी सदैव माझ्या जवळ बाळगणार असुन ही मातीच मला लढण्याची उर्जा व प्रेरणा देणारी असल्याचे यावेळी बोलताना पंकजाताई मुंडे यांनी सांगितले.

अब की बार, चारसो बीस भाजप हद्दपार करा – पुजाताई मोरे

गेवराई । प्रतिनिधी

अब की बार हे बनवाबनवी करण्यात तरबेज असलेले व फसव्या घोषणा करणारे चारसो बीस भाजप हद्दपार करा असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या किसान सेलच्या प्रदेशाध्यक्षा पुजाताई मोरे यांनी तलवडा (ता. गेवराई) येथे कॉर्नर सभेत केले.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार व इंडिया आघाडीचे उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे यांच्या प्रचारार्थ तलवाडा (ता. गेवराई) येथे आयोजित कॉर्नर सभेत राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्षाच्या किसान सेलच्या प्रदेशाध्यक्षा पुजाताई मोरे या बोलत होत्या. यावेळी माजी मंत्री बदामराव पंडित, युवा नेते युद्धजित पंडित यांची प्रमुख उपस्थिती होती.

पुढे बोलताना पुजाताई मोरे यांनी भाजपच्या अबकी बार....या घोषणेचा खरपूस समाचार घेत केंद्रात आणि राज्यात भाजपा सरकार असताना जिल्ह्यात पंकजा मुंडे, प्रितम मुंडे, धनंजय मुंडे हे रोजगार निर्मिती व विकासाच्या बाबतीत कुचकामी आहेत. असा आरोप ही त्यांनी केला. अशा बिनकामाच्या भाजप उमेदवाराला मतदान करून मतदान वाया घालवू नका असे म्हणत त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार व महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांना मतदान करीत निवडून आणावे. असे आवाहन केले.

प्रा.ईश्वर मुंडे यांनी केले आ.जयंत पाटील यांचे सारथ्य

बीड । प्रतिनिधी

बीड लोकसभा निवडणूकीची धामधूम चालू आहे.सोमवार दि.२२ /४/२०२४ रोजी महा विकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला.

बजरंग सोनवणे यांचा उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस-शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आ.जयंत पाटील हे बीड येथे आले होते.

पोलीस मुख्यालयाच्या हेली पॅडवर पक्षातील मान्यवरांनी आ.जयंत पाटील यांचे स्वागत केले.या वेळी आ.जयंत पाटील यांनी बीड लोकसभेचे ईच्छूक उमेदवार तथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष सेवा निवृत्त अधिकारी कर्मचारी सेल चे राज्य प्रमुख प्रा.ईश्वर मुंडे यांच्या एम.एच.४४ टी ५०० फॉर्च्युनर गाडीने हेली पॅड ते बीड राष्ट्रवादी भवन असा प्रवास केला. विशेष म्हणजे प्रा.ईश्वर मुंडे यांनी स्वत: गाडी चालवून आ.जयंत पाटील यांचे सारथ्य केले. या वेळी गाडी मध्ये युवक प्रदेशाध्यक्ष महेबुब शेख, बीड जिल्हा निरिक्षक जीवनराव गोरे होते.

शिवसेना संपर्क कार्यालयाचे संपर्कप्रमुख किशोर पोतदार यांच्या हस्ते उद्घाटन

बीड । प्रतिनिधी

जनतेच्या सेवेत शिवसेना बीड जिल्हा जनसंपर्क कार्यालय २४ घंटे सुरू. पत्ता: शिवसेना जनसंपर्क कार्यालय बाजीराव जगताप कॉम्प्लेक्स बार्शी रोड बीड. शिवसेना पक्षप्रमुख तथा माजी मुख्यमंत्री उद्धवजी बाळासाहेब ठाकरे यांच्या आदेशाने व युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे,आमदार तथा मराठवाडा संपर्क नेते सुनीलजी प्रभू साहेब, उपनेत्या सुषमाताई अंधारे, मराठवाडा समन्वयक विश्वनाथ नेरूरकर साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली,शिवसेनेचे जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांच्या जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन शिवसेनेचे संपर्कप्रमुख किशोरजी पोतदार साहेब यांच्या हस्ते संपन्न झाले..!! यावेळी लोकसभा प्रमुख सुनील धांडे सर,सह संपर्क प्रमुख बाळासाहेब अंबुरे साहेब,जिल्हाप्रमुख रत्नाकर आप्पा शिंदे,राष्ट्रवादी चे शिवराज बांगर, उपजिल्हाप्रमुख हनुमान जिजा जगताप, उपजिल्हाप्रमुख आजिनाथ खेडकर, युवासेना जिल्हा युवा अधिकारी रविराज बडे,शहर प्रमुख शेख निजाम भाई, जिल्हा संघटक रतन तात्या गुजर, जिल्हा संघटक नितीन भैय्या धांडे,विधानसभा प्रमुख सुशील भैय्या पिंगळे,अंबाजोगाई चे तालुका प्रमुख बाळासाहेब शेप,शिरूर तालुका प्रमुख सोपान काका मोरे,केज तालुका प्रमुख अशोक जाधव,धारूर चे शहर प्रमुख बाबा सराफ,के.के वडमारे, अंबाजोगाई शहर प्रमुख अशोक हेडे, मराठवाडापत्र चे संपादक दत्तात्रय नरनाळे सर,केज शहरप्रमुख तात्या रोडे,उपतालुकाप्रमुख बालाजी चाटे,उपतालुकाप्रमुख शिवनारायण गुजर,उपतालुकाप्रमुख निखिल पडूळे,युवा सेना श्रीकांत कदम,तालुका सचिव बाबा भिसे,शहर सचिव शंकर भिसे, विनोद गूंड पाटील,अजय गायकवाड,दिपक घोडके,रमेश मुंडे,जयंत वाघ,बापू सातपुते, निलेश पवार गोरख भेटे,लखन जाधव, व सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जातीयवादी शक्तीला रोखण्यासाठी स्वाभिमानी रिपब्लिकन सेनेचा बजरंग सोनवणे यांना बिनशर्त जाहीर पाठिंबा -साळवे

माजलगाव । प्रतिनिधी

स्वाभिमानी रिपब्लिकन सेनेचे अध्यक्ष विजय साळवे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार गटाचे महाराष्ट्र अध्यक्ष जयंत पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत बीड लोकसभेचे अधिकृत उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे यांना बिनशर्त पाठिंबा दिला असल्याचे जाहीर केले आहे.

देशात व महाराष्ट्रात एस.सी., एस. टी. ओबीसी यांना नोकऱ्यांमध्ये आरक्षणास विरोध करणारी ही जातीयवादी शक्ती समाजात समाजात तेढ निर्माण करणाऱ्या व महिलांना तुच्छतेची वागणूक देणाऱ्या देशाची राज्यघटना बदलू पाहणाऱ्या संविधान विरोधी तसेच लोकशाहीची हत्या करणाऱ्या भाजपा सारख्या जातीयवादी विचारधारेला रोखण्यासाठी , पुरोगामी विचारांच्या शिव, शाहू, फुले, आंबेडकर यांच्या विचारांशी प्रामाणिक असणाऱ्या महाविकास आघाडीतील घटक पक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार गटातील बीड लोकसभेचे अधिकृत उमेदवार श्री बजरंग बप्पा सोनवणे यांना स्वाभिमानी रिपब्लिकन सेना चे सरसेनापती मा. विजयदादा साळवे यांनी मा. जयंत पाटिल यांच्या उपस्थितीत दिनांक २२ एप्रिल रोजी बिनशर्त पाठिंबा जाहीर केला आहे. प्रसंगी स्वाभिमानी रिपब्लिकन सेनेचे कार्याध्यक्ष पंडित ओव्हाळ, अंजेराम घनघाव , प्रदिप सिरसाट , राजकुमार मोरे , शेख मजहर , वैजनाथ गडसिंग , सय्यद अन्वर, भास्कर पौळ, सुबोध गायसमुद्रे , विलास पाईकराव , वशिष्ठ लांडगे , विशाल ससाने , विश्वनाथ तोडके , छगन जाधव , सोनजी गानकवाड , राजेश टाकणखार , बाळु साळवे , राहूल गायकवाड , कन्हेया बनगे , राहूल सिरसट , गणेश जाधव , निवृत्ती गायकवाड , रामा जाधव, विलास खळगे , बाळु तुपारे , बबन चोपडे , बाबा गाडेकर , महादु उघडे , आबा चांदमारे , राहुल सिरसट , अशोक निकाळजे यांची उपस्थिती होती.

बीड लोकसभा मतदारसंघ निवडणूक पाचव्या दिवशी ५ अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल

बीड । प्रतिनिधी

३९ बीड लोकसभा मतदारसंघामध्ये आज पाचव्या दिवशी पाच नामनिर्देशन पत्र दाखल झाली असून हे सर्व अपक्ष उमेदवार आहेत.

३९ बीड लोकसभा मतदारसंघातून आज ५ अपक्ष उमेदवारांनी अर्ज दाखल केले. यामध्ये शेख याशेद शेख तय्यब, वचिष्ट उद्धव कुटे, राजेंद्र अच्युतराव होके आणि शितल शिवाजी धोंडरे यांनी दोन अर्ज सादर केले. असे एकूण पाच नामनिर्देशन अर्ज जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांच्या समक्ष सादर केले आहेत. आज पर्यंत एकूण १०८ इच्छुक उमेदवारांना २४६ नामनिर्देशन पत्रांचे वाटप करण्यात आले आहे. ३९ बीड लोकसभा मतदारसंघासाठी दि. १८ एप्रिल २०२४ रोजी अधिसूचना जारी करण्यात आली असून २५ एप्रिल २०२४ ही उमेदवारी अर्ज भरण्याची शेवटची तारीख आहे. तर २६ एप्रिल२०२४ रोजी उमेदवारी अर्जांची छाननी करण्यात येणार आहे. २९ एप्रिल २०२४ ही अर्ज मागे घेण्याची शेवटची तारीख आहे. सोमवार दि. १३ मे २०२४ रोजी मतदान होणार आहे. तर ४ जून रोजी मतमोजणी केली जाईल. निवडणूक आदर्श आचारसंहिता ६ जूनपर्यंत राहील.

आतापर्यंत सादर केलेले नामनिर्देशन अर्ज

अपक्ष उमेदवार- शेख तौसिफ अब्दुल सत्तार, सादिक इब्राहिम शेख, उदयभान नवनाथ राठोड, शेख एजाज शेख उमर, भास्कर किसन शिंदे, तुकाराम विठोबा उगले, शेख याशेद शेख तय्यब, वचिष्ट उद्धव कुटे, राजेंद्र अच्युतराव ठोके व शितल शिवाजी धोंडरे (दोन अर्ज) भारतीय जवान किसान पार्टी (इंडिया) पक्षाकडून अंकुश रामा खोटे यांनी अर्ज दाखल केला. नॅशनॅलिस्ट काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार या पक्षाकडून बजरंग मनोहर सोनवणे यांनी दोन अर्ज तर सारिका बजरंग सोनवणे यांनी एक अर्ज दाखल केला.

पंकजाताई मुंडे यांच्या माध्यमातून जिल्ह्यात विकासाची गंगा येणार-डॉ.योगेश क्षीरसागर

बीड । प्रतिनिधी

पंकजाताई मुंडे या ग्रामविकास मंत्री असताना बीड जिल्ह्यात कोट्यवधींचा निधी आला. त्यांच्या माध्यमातून जिल्हा विकासाच्या वाटेवर पोहोचला. आता पुन्हा एकदा त्यांच्या पंकजाताईंच्या माध्यमातून जिल्ह्यात विकासाची गंगा येणार आहे, असा विश्वास राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी व्यक्त केला आहे.

महायुतीच्या बीड लोकसभेच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्या विजयासाठी डॉ.योगेश क्षीरसागर हे जिल्हा परिषद गटनिहाय प्रचार दौरे करत आहेत. राजुरी (ता.बीड) येथे सोमवारी (दि.२२) जिल्हा परिषद गटातील राष्ट्रवादी काँग्रेस, भाजपसह मित्र पक्षांच्या प्रमुख सहकाऱ्यांची बैठक पार पडली. यावेळी डॉ.क्षीरसागर हे बोलत होते.व्यासपीठावर भाजपचे जिल्हा सरचिटणीस अॅड.सर्जेराव तांदळे, डॉ.सारिकाताई क्षीरसागर, गणेश जावळे, किशोर पिसाळ, नाना बहिर, राजाभाऊ बहिर, हनुमान सिरसट, दिनकर पाटील, प्रकाश पिसाळ, गोकुळ शेंडगे, शिवाजी होले, जयराम गित्ते, अॅड.सदाशिव राहिंज, पोपट टुले, निकिता बहिर, अशोक म्हेत्रे, संगीता तांदळे आदींची उपस्थिती होती.

पुढे बोलताना डॉ.योगेश क्षीरसागर म्हणाले, पंकजाताई मुंडे यांच्या विजयासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष तन-मन-धनाने काम करत आहे. पंकजाताई या केवळ खासदार म्हणून नव्हे तर केंद्रीय मंत्री म्हणूनच निवडून द्यायच्या आहेत. तालुक्यातील राजुरी भागातील जलसिंचनाचा प्रलंबित प्रश्न, रस्ते, स्लिप रोडसह शहरी, ग्रामविकासाचे प्रश्न पंकजाताई मुंडे यांच्या माध्यमातून सोडविले जातील. तसेच, केंद्र सरकारच्या माध्यमातून भरीव निधी देण्याची ग्वाही पंकजाताई यांनी दिली आहे. त्यामुळे मोठ्या मताधिक्याने विजयी करण्याचे आवाहन त्यांनी केले. यावेळी राजुरी जिल्हा परिषद गटातील राष्ट्रवादी काँग्रेस, भाजपसह मित्र पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, सरपंच मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पंकजाताईंच्या विजयासाठी क्षीरसागर दाम्पत्य ताकदीने कामाला लागले -अॅड.सर्जेराव तांदळे

बीड लोकसभा निवडणुकीचा प्रचार सुरू झाल्यापासून बीड विधानसभा मतदारसंघात क्षीरसागर दाम्पत्य पूर्ण ताकतीने कामाला लागले आहे. डॉ.योगेश क्षीरसागर यांचे भविष्य उज्ज्वल आहे. त्यांच्या प्रभावी प्रचारातून पंकजाताईंना मोठे मताधिक्य मिळणार आहे. त्यांची पूर्ण यंत्रणा देखील ताकदीने काम करत आहे. बीड मतदारसंघातून भाजप महायुतीच्या उमेदवार पंकजाताईंना मोठी लीड मिळेल, असा विश्वास भाजपचे जिल्हा सरचिटणीस अॅड.सर्जेराव तांदळे यांनी व्यक्त केला.

पंकजाताईंना संसदेत पाठवा-डॉ.सारिकाताई क्षीरसागर

आपल्या हक्काच, सर्वसमावेशक आणि सुसंस्कृत नेतृत्व संसदेत पाठवण्यासाठी पंकजाताईंना मतदानरुपी आशीर्वाद द्यावेत. त्याच्या माध्यमातून जिल्ह्याचा विकास होणार असून कुठल्याही भूलथापांना बळी न पडता पंकजाताई मुंडे यांना मतदान करावे, असे आवाहन डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी केले आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske, Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात विद्यार्थ्यांना निकृष्ट जेवण, मेस कर्मचाऱ्यांकडून धमकी, कुलगुरूंकडे तक्रार करून आंदोलनाचा इशारा

पुणे । प्रतिनिधी

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील मेसमध्ये विद्यार्थ्यांना अत्यंत निकृष्ट दर्जाचे जेवण दिले जात असल्याने विद्यार्थ्यांचे आरोग्य धोक्यात आले आहे. आंबट चपात्यांची तक्रार काही विद्यार्थ्यांनी केल्याने येथील कर्मचाऱ्यांनी बघुन घेण्याची धमकी विद्यार्थ्यांना दिल्याने विद्यार्थी संघटना आक्रमक झाल्या आहेत. यासंबंधीची तक्रार विद्यापीठाच्या कुलगुरूंकडे करण्यात आली असून ताबडतोब कारवाई न केल्यास आंदोलनाचा इशारा विद्यार्थ्यांनी दिला आहे. विद्यार्थ्यांना देण्यात आलेल्या धमकीबाबत तसेच निकृष्ट जेवणाची तक्रार विद्यापीठ विद्यार्थी संघर्ष कृती समितीने कुलगुरूंकडे केली आहे. समितीचे राहुल ससाणे, रोहित भामरे, बालाजी मिसाळ, मयुर जावळे, विशाल झांझरे यांच्या सहीचे निवेदन कुलगुरूंना देण्यात आले आहे.

कुलगुरूंना देण्यात आलेल्या निवेदनात समितीने म्हटले आहे की, आज दिनांक २२ एप्रिल २०२४ रोजी आपल्या विद्यापीठाच्या रिफेक्ट्रीमध्ये अत्यंत निकृष्ट दर्जाचे जेवण दिले गेले. चौकशीअंती निष्पन्न झाले की, चपात्याचे पिठ हे खराब झालेले होते. त्यामुळे सर्व चपात्या आंबट लागत होत्या. यासंबंधीचीच्या अनेक तक्रारी विद्यार्थ्यांकडून प्राप्त झालेल्या आहेत.

उपस्थित विद्यार्थ्यांनी मेस चालक व मेस कर्मचारी यांना निकृष्ट जेवणासंदर्भात विचारणा केली व असे निकृष्ट जेवण विद्यार्थ्यांना देऊ नका विद्यार्थ्यांना विषबाधा होऊ शकते, अशी विनंती केली असता संबंधित कर्मचाऱ्यांनी एका विद्यार्थ्यांस पाहून घेण्याची धमकी दिली. मी लोकलचा आहे, अशा पद्धतीची भाषा विद्यार्थ्याला वापरली गेली. कर्मचाऱ्यांनी हायजेनची काळजी घेण्याऐवजी, तसेच विद्यार्थ्यांना उत्तम व पौष्टिक अन्न देण्याऐवजी उलट कर्मचारी विद्यार्थ्यांना पाहून घेण्याची धमकी देत असतील तर ही अत्यंत निंदनीय बाब आहे. आमची विद्यापीठ प्रशासनाला विनंती आहे की, संबंधित मेस चालक व कर्मचारी यांच्यावर तात्काळ दंडात्मक कारवाई करावी.

विद्यापीठ प्रशासनाला इशारा देताना समितीने निवेदनात पुढे म्हटले आहे की, जर निकृष्ट अन्न खाऊन एखाद्या विद्यार्थ्याला विषबाधा झाली किंवा कर्मचाऱ्यांकडून विद्यार्थ्याला मारहाण झाली तर त्याला सर्वस्वी जबाबदार तो कर्मचारी, मेसचालक व विद्यापीठ प्रशासन राहील. विद्यार्थ्यांच्या जीवाशी खेळण्याचे काम कोणी करत असेल आणि त्यांना धमकी देण्याचे काम कोणी करत असेल तर आम्ही त्याचे उत्तर तीव्र आंदोलनाने देऊ. दोन दिवसांपूर्वी मुंबई विद्यापीठामध्ये ४० विद्यार्थ्यांना विश्वासा झाल्याचे घटना घडलेली आहे आपल्या विद्यापीठात अशा पद्धतीची घटना घडू नये यासाठी आपण सर्वांनी खबरदारी घेतली पाहिजे, असे निवेदनात म्हटले आहे.

२ पिस्तूल व ४ जिवंत काडतुसासह सराईत गुन्हेगाराला येरवडा पोलिसांकडून अटक

पुणे । प्रतिनिधी

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी शहरातील कुख्यात गुन्हेगारांची परेड घेतली होती. त्यानंतर शस्त्र बाळगल्याप्रकरणी गुन्हा दाखल असलेल्या गुन्हेगारांची हजेरी घेतली होती. अशातच येरवडा पोलिसांनी एका सराईत गुन्हेगाराकडून २ पिस्टल आणि ४ काडतुसे जप्त केली आहेत. ही कारवाई वडगाव शेरी भागातील नदीपात्राजवळ असलेल्या मोकळ्या जागेत करण्यात आली.

अभिषेक नारायण खोंड (वय-२३ रा. लोहगाव रोड, वाघोली, पुणे) असे अटक केलेल्या सराईत गुन्हेगाराचे नाव आहे. आरोपीवर येरवडा पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल असून मोक्का गुन्ह्यात येरवडा कारागृहात होता. सहा महिन्यापूर्वी तो येरवडा कारागृहाबाहेर आला होता.

येरवडा पोलीस ठाण्यातील पोलीस अंमलदार कैलास डुकरे व सुशांत भोसले हे १७ एप्रिल रोजी गुन्हेगार तपासत असताना त्यांना माहिती मिळाली की, सराईत गुन्हेगार अभिषेक खोंड याच्याकडे पिस्टल असून तो वडगाव शेरी भागातील नदीपात्राजवळ असलेल्या मोकळ्या जागेत कोणाची तरी वाट बघत थांबला आहे. त्यानुसार पोलिसांच्या पथकाने त्याठिकाणी जाऊन सापळा रचून आरोपीला ताब्यात घेतले.

पोलिसांनी आरोपीची अंगझडती घेतली असता त्याच्याकडून एक पिस्टल व दोन काडतुसे जप्त केली. त्याच्यावर आर्म ॲक्ट नुसार गुन्हा दाखल करुन अटक केली. त्याची पोलीस कस्टडी घेऊन सखोल तपास केला असता त्याच्याकडून आणखी एक पिस्टल व दोन काडतुसे जप्त करण्यात आली.आरोपीकडून ६५ हजार ५०० रुपये किमतीचे एकूण २ पिस्टल व ४ काडतुसे जप्त करण्यात आली आहेत.

ही कारवाई अपर पोलीस आयुक्त पूर्व प्रादेशिक विभाग मनोज पाटील, पोलीस उपायुक्त परिमंडळ ४ विजयकुमार मगर, सहायक पोलीस आयुक्त आरती बनसोडे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक संतोष पाटील, पोलीस निरीक्षक गुन्हे राहुल जगदाळे यांच्या मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे अधिकारी पोलीस उपनिरीक्षक स्वप्नील पाटील, श्रेणी पोलीस उपनिरीक्षक प्रदीप सुर्वे, पोलीस अंमलदार गणपत थिकोळे, दत्ता शिंदे, तुषार खराडे, किरण घुटे, कैलास डुकरे, सागर जगदाळे, अनिल शिंदे, सुरज ओंबासे, दत्तात्रय शिंदे, प्रशांत कांबळे, सुशांत भोसले, विठ्ठल घुले, नटराज सुतार यांच्या पथकाने केली.

पाच हजार रुपये लाच घेताना पोलीस उपअधीक्षक अँटी करप्शनच्या जाळ्यात

पुणे । प्रतिनिधी

नर्सिंग ऑफिसर म्हणून कार्यरत असणाऱ्या पाच महिलाकडून प्रत्येकी एक हजार प्रमाणे पाच हजार रुपये लाच घेताना धुळे येथील राज्य आपत्ती प्रतिसाद दलाचे सहायक समादेशक तथा पोलीस उपअधीक्षक चंद्रकांत बाबुराव पारसकरांना धुळे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहात पकडले. ही कारवाई सोमवारी (दि.२२) एसआरपी कॉलनी, नकाणे रोड, धुळे येथे राहत्या घरी केली.

तक्रारदार हे राज्य राखीव पोलीस बल गट क्रमांक ६ अंतर्गत राज्य आपत्ती प्रतिसाद दल, धुळे येथे नर्सिंग ऑफिसर म्हणून कार्यरत आहेत. तक्रारदार व त्यांच्या सोबत इतर पाच महिला नर्सिंग ऑफिसर हे १४ व १५ एप्रिल रोजी कर्तव्यावर गैरहजर होते. त्यामुळे सहायक समादेशक तथा पोलीस उपअधीक्षक चंद्रकांत पारसकर यांनी त्यांच्याकडून गैरहजेरीबाबत खुलासा घेतला होता. त्यानंतर पारसकर यांनी तक्रारदार यांना बोलावून गैरहजर राहिलेल्या कर्मचाऱ्यांकडुन प्रत्येकी एक हजार प्रमाणे पाच हजार रुपये जमा करुन आणून दे, नाहीतर सर्वांची बिनपगारी करेल, असे तक्रारदारांना सांगितले होते. तक्रारदार यांनी कर्मचाऱ्यांकडून पैसे जमा केली. मात्र, लाच देणे मान्य नसल्याने तक्रारदार यांनी एसीबीकडे तक्रार केली.

एसीबीच्या पथकाने पडताळणी केली. त्यावेळी येथील राज्य आपत्ती प्रतिसाद दलाचे सहायक समादेशक तथा पोलीस उपअधीक्षक चंद्रकांत बाबुराव पारसकर यांनी लाच मागितल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार पथकाने सापळा रचला. एसीबीच्या पथकाने सापळा रचल्याचे समजताच पारसकर यांनी लाचेची रक्कम खाली टाकून दिली असता त्यांना ताब्यात घेतले. त्यांच्या विरोधात देवपुर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई नाशिक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्र पोलीस अधीक्षक शर्मिष्ठा वालावलकर, अपर पोलीस अधीक्षक माधव रेड्डी, वाचक पोलीस उप अधिक्षक नरेंद्र पवार, लाचलुचपत प्रतिबंधक धुळे विभागाचे पोलीस उपाधिक्षक अभिषेक पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक रुपाली खांडवी, तसेच राजन कदम, मुकेश अहिरे, प्रशांत बागुल, संतोष पावरा, रामदास बारेला, प्रविण पाटील, मकरंद पाटील, प्रविण मोरे, सुधीर मोरे व जगदीश बडगुजर यांच्या पथकाने केली आहे.

पुणे ११, तर शिरूरमधून ७ उमेदवारांचे अर्ज

पुणे । प्रतिनिधी

लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यातील उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू आहे. त्यानुसार सोमवारपर्यंत (दि. २२) पुणे मतदारसंघातून ११ उमेदवारांनी, तर शिरूर मतदारसंघातून ७ उमेदवारांनी अर्ज भरले आहेत. जिल्ह्यात दोन टप्प्यांत मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. त्यानुसार पुणे लोकसभा मतदारसंघासाठी १८ एप्रिलपासून उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. आजतागायत महाविकास आघाडीकडून काँग्रेस गटाचे अधिकृत उमेदवार रवींद्र धंगेकर यांनी, तर वंचित बहुजन आघाडीचे वसंत मोरे यांचा अर्ज दाखल झाला आहे.

त्याचबरोबर स्थानिक पक्ष आणि अपक्ष मिळून ९ अशा तब्बल ११ उमेदवारांनी अर्ज दाखल केले आहेत, तर ८० व्यक्ती अर्ज घेऊन गेले आहेत. शिरूर लोकसभा मतदारसंघातून महाविकास आघाडीकडून शरदचंद्र पवार गटाचे अधिकृत उमेदवार अमोल कोल्हे यांनी उमेदवारी अर्ज भरला आहे. त्याचबरोबर स्थानिक पक्ष आणि अपक्ष उमेदवार म्हणून ६ व्यक्तींकडून असे एकूण ७ अर्ज दाखल झाले आहेत, तर ७३ व्यक्ती अर्ज घेऊन गेले आहेत. दोन्ही मतदारसंघांत ज्या उमेदवारांनी अर्ज भरले आहेत, त्यांच्या कागदपत्रांमध्ये

असलेल्या त्रुटींसंदर्भात उमेदवारांना संपर्क साधून असलेल्या त्रुटी दूर करण्यासंदर्भात कार्यवाही सुरू आहे. २५ एप्रिल रोजी दुपारी तीनपर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत असणार आहे.

शनिवारवाडा गेटवर पावणेचार लाखांची रोकड जप्त

शिवाजी रस्त्यावरील शनिवारवाडा गेट नाक्यावर २४ तास पोलिस व प्रशासन यांचे पथक कार्यरत असते. शनिवारवाडा गेट येथे स्थिर सर्वेक्षण पथकाचे एसएसटी पथक प्रमुख रमेश पाटील, पीएसआय असगर अली सय्यद, पी.सी.बोराडे, नागरगोजे येथे कार्यरत होते. सोमवारी सकाळच्या सुमारास शनिवारवाडा गेट परिसरात वाहनांची तपासणी सुरू असताना ऑडी कारची (क्र.एमएच१२ एसवाय ९०८१) अडवून झडती घेतली असताना त्यात ३ लाख ८० हजार ५०० रुपयांची रोकड जप्त करण्यात आली आहे. सदर रक्कम कोषागारात जमा करण्यात आली आहे. आचारसंहितेचा भंग होईल अशा प्रकारच्या गैरप्रकारांना आळा बसावा यासाठी निवडणूक आयोगाच्या वतीने कसबा विधानसभा अंतर्गत शिवाजी रस्त्यावरील शनिवारवाडा परिसर तसेच स्वारगेट परिसरातील नटराज हॉटेल या नाक्यांवर पोलिसांकडून संशयास्पद वाहनांची कसून चौकशी सुरू आहे. त्यामध्ये संबंधितांचे गाडी नंबर, नावाची रजिस्ट्रमध्ये नोंद केली जात आहे.

'देश घडवणाऱ्या पिढीचा मोदींकडून अपमान' : अतुल लोंढे

पुणे । प्रतिनिधी

आपल्या अगोदरच्या पिढीने देशाचा पाया रचला. काँग्रेसने धोरणात्मक निर्णय घेतले, त्यामुळे आपला देश विकसनशील देशांच्या शर्यतीत आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी व भाजप नेते काँग्रेसचा नव्हे तर देश घडवणार्या पिढीचा अपमान करत आहेत. मोदींच्या जेवढ्या जास्त सभा होतील, तेवढ्या जास्त जागा महाविकास आघाडीला मिळतील, असा विश्वास काँग्रेसचे प्रदेश प्रवक्ते अतुल लोंढे यांनी व्यक्त केला आहे. काँग्रेस भवनमध्ये आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत लोंढे बोलत होते. या वेळी काँग्रेस शहराध्यक्ष अरविंद शिंदे, प्रदेश उपाध्यक्ष मोहन जोशी, ॲड. अभय छाजेड उपस्थित होते. लोंढे म्हणाले, संविधानाची तोडफोड केली जात आहे. ईडी, सीबीआय या संस्थांचा अमर्यादा वापर करून राजकीय अस्वस्थता निर्माण केली जात आहे. जाती-धर्मात तेढ निर्माण केले जात आहे.

बेपत्ता शाळकरी मुलीची माहिती देणाऱ्या नागरिकांना पोलीस आयुक्तांकडून बक्षीस

पुणे । प्रतिनिधी

नांदेड सिटी परिसरातून बेपत्ता झालेल्या शाळकरी मुलीची माहिती देणाऱ्या नागरिकांच्या सतर्कतेचे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी कौतुक केले. बेपत्ता मुलगी रांजणगाव येथील महागणपती मंदिरात सापडल्यानंतर पोलिसांना तपासात मदत करून मुलीची माहिती देणाऱ्या पाचजणांना पोलीस आयुक्तांनी एक लाख रुपयांचे रोख बक्षीस दिले.

नांदेड सिटी परिसरातून १२ वर्षीय मुलगी गुरुवारी (१८ एप्रिल) बेपत्ता झाली होती. शाळकरी मुलगी बेपत्ता झाल्यानंतर पोलिसांनी युद्धपातळीवर तपास सुरू केला. पोलीस आयुक्तांसह वरिष्ठ अधिकारी मुलीचा शोध घेण्यासाठी रस्त्यावर उतरले. मुलीची माहिती देणाऱ्या नागरिकांना एक लाख रुपयांचे बक्षीस पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी जाहीर केले. बेपत्ता झालेल्या मुलीने नगर रस्त्यावरील एका खाद्यपदार्थ विक्रेत्याकडे वडापाव खाला. त्यानंतर ती नगर रस्त्याने पायी चालत पुढे गेल्याची माहिती तपासात मिळाली.

मुलगी बेपत्ता झाल्यानंतर पोलिसांनी समाजमाध्यमात संदेश प्रसारित केला होता, तसेच मुलीची माहिती देणाऱ्यास एक लाख रुपयांचे बक्षीस देण्याचे जाहीर केले होते. युवराज वानखेडे यांनी संबंधित संदेश पाहिला होता. रांजणगाव परिसरातील महागणपती मंदिरात मुलगी असल्याची माहिती वानखेडे यांनी पोलिसांना दिली. त्यानंतर मुलगी मंदिरात सापडली. मुलीला आणण्यासाठी पोलीस आयुक्त तेथे गेले होते. मुलीचा शोध घेण्यासाठी सिंहगड रस्ता परिसरातील सामाजिक कार्यकर्ते शिवा पासलकर, शरद घोडके, सनंदमधील महाराष्ट्र वडापावचे मालक संभाजी अशोक सातव, युवराज वानखेडे, संजय पाटीलबुवा गाडे यांनी पोलिसांना मदत केली.

पोलीस आयुक्तालयात पासलकर, घोडके, सातव, वानखेडे, गाडे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी त्यांना विभागून एक लाख रुपयांचे रोख बक्षीस देण्यात आले. अतिरिक्त पोलीस आयुक्त प्रवीणकुमार पाटील, गुन्हे शाखेचे उपायुक्त अमोल झेंडे यावेळी उपस्थित होते.

पुण्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा मुरलीधर मोहोळ यांच्यासाठी 'रोड शो', प्रचारसभाही होणार

पुणे । प्रतिनिधी

पुणे लोकसभेचे महायुतीचे भाजपाचे उमेदवार मुरलीधर मोहोळ यांच्या प्रचारासाठी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी दिनांक २९ एप्रिल रोजी पुण्यात येणार आहेत. यावेळी मोदींचा रोड शो होणार असून त्याकडे संपूर्ण देशाचे लक्ष असणार आहे. तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची एस. पी. कॉलेजच्या मैदानात जाहीर प्रचारसभा देखील होणार आहे. या सभेत पंतप्रधान मोदी काय बोलणार हे महत्वाचे ठरणार आहे.

महायुतीच्या बारामती लोकसभा मतदारसंघातील उमेदवार सुनेत्रा पवार यांच्या खडकवासला येथील निवडणूक कार्यालयाच्या उद्घाटनप्रसंगी अजित पवार यांनी ही माहिती दिली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सभेसाठी आधी कात्रज, एनडीए येथील मैदाने तसेच नंतर खडकवासल्यामध्ये जागेची चाचपणी करण्यात आली होती. मात्र, प्रशस्त मैदान नसल्याने स.प. महाविद्यालयाच्या मैदानात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची सभा होणार आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सभेची तयारी सुरू झाली आहे. या सभेपूर्वी पुण्यात रोड शो देखील होणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सभेची तयारी सुरू झाली आहे. या सभेपूर्वी पुण्यात रोड शो देखील होणार आहे. पुण्यातील एस. पी. कॉलेजच्या मैदानावर चाळीस हजार लोकांच्या बसण्याची व्यवस्था होऊ शकते. यासाठी येथील जागेवर ही सभा होणार आहे. पुण्यातील मोदींचा रोड शो, तसेच जाहीर प्रचारसभेकडे संपूर्ण देशाचे लक्ष असणार आहे. पंतप्रधान मोदी पुण्यातील जाहीर सभेत काय बोलणार याकडे सर्वांचे लक्ष असणार आहे.

व्हीव्हीपॅटमध्ये दिसणाऱ्या चिठ्ठी बाबत सोशल मिडीयावर प्रसारित होणाऱ्या संदेशाबाबत जिल्हाधिकाऱ्यांचे स्पष्टीकरण

पुणे । प्रतिनिधी

मतदानांनतर व्हीव्हीपॅट मशीनमध्ये दिसणाऱ्या चिठ्ठीबाबत व्हॉट्सप वरुन एक चित्रफीत व त्यासोबत संदेश प्रसारीत होत असून त्याअनुषंगाने जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी चाचणी मतदानाबाबत स्पष्टीकरण दिले आहे.

प्रसारीत होत असलेला संदेश हा मतदानाच्या दिवशी, मतदान करताना मतदाराने ज्या पक्षाला मतदान केले आहे त्या पक्षाची चिठ्ठी व्हीव्हीपॅटमध्ये खाली पडताना न दिसल्यास हरकत घेण्याबाबतच्या आशयाचा आहे.

त्या अनुषंगाने एखाद्या मतदाराने त्याने केलेले मतदान हे इतर उमेदवारास दर्शवित असल्याबाबत अभिकथन केले असल्यास सदर मतदारास निवडणूक संचालन नियम १९६१ च्या नियम ४९ एमए अन्वये चाचणी मतदान करणेसाठी प्रतिज्ञापत्र सादर करावयाची तरतुद आहे. तसेच सदर प्रतिज्ञापत्रकात मतदाराने केलेले अभिकथन चुकीचे आढळल्यास भारतीय दंड सहिता कलम १७७ अन्वये दंडात्मक तरतूद असल्याबाबतचेदेखील नमूद आहे, असेही जिल्हा निवडणूक प्रशासनातर्फे स्पष्ट करण्यात आले आहे.

विनापुरवणी परीक्षेला प्रारंभ; पावणेचार लाखांवर विद्यार्थी सामोरे जाणार परीक्षेला

पुणे । प्रतिनिधी

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या सर्व विद्याशाखांच्या प्रथम ते अंतिम वर्षाच्या उन्हाळी सत्राची परीक्षा पारंपरिक पद्धतीने आज दि. २३ एप्रिलपासून सुरू होणार आहे. या परीक्षेसाठी विद्यापीठाने उत्तरपत्रिकांतील पाने वाढविण्याचा निर्णय घेऊन पुरवणी सुविधा बंद केली आहे. त्याचबरोबर उजव्या बाजूला विद्यार्थ्यांना समास आखता येणार नाही. ३ लाख ७८ हजार ६४३ विद्यार्थी परीक्षेला बसणार असल्याची माहिती विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळातील अधिकार्यांनी दिली आहे. विद्यापीठाच्या परीक्षा आणि मूल्यमापन मंडळाकडून पदविका, पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षांचे नियोजन करण्यात आले आहे. त्यानुसार २७४ अभ्यासक्रमांच्या

परीक्षा २३ एप्रिल ते १३ जूनदरम्यान होणार आहेत.

मे महिन्याच्या अखेरपर्यंत मुख्य अभ्यासक्रमांच्या परीक्षा पार पडणार आहेत, तर जून महिन्यात उर्वरित परीक्षा होणार आहे. परंतु, सर्व परीक्षांचा निकाल जून महिन्याच्या अखेरपर्यंत जाहीर करण्याची तयारी परीक्षा आणि मूल्यमापन मंडळाकडून करण्यात आली आहे. त्यासाठी पुणे, नाशिक आणि नगर जिल्ह्यातील महाविद्यालयांच्या परीक्षांची जबाबदारी असणार्या प्राध्यापकांच्या कार्यशाळा घेण्यात आल्या आहेत. या कार्यशाळा तिन्ही जिल्ह्यांतील महत्त्वाच्या महाविद्यालयांत झाल्या आहेत. त्यामध्ये निकाल तातडीने लागण्याच्या दृष्टीने आवश्यक सूचना देण्यात आल्या आहेत.

पारंपरिक अभ्यासक्रमातील पदवीस्तरावरील (कला, वाणिज्य, विज्ञान, विधी) अभ्यासक्रम वगळून पदव्युत्तर स्तरावरील सर्व वर्षांच्या, व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या सर्व वर्षांच्या परीक्षांचे आयोजन विद्यापीठस्तरावर करण्यात येणार आहे. पदवीस्तरावरील प्रथम वर्षाच्या (कला, वाणिज्य, विज्ञान, विधी) परीक्षांवेळी महाविद्यालयाने स्वत:च्या उत्तरपत्रिका वापराव्यात, विद्यापीठाच्या उत्तरपत्रिका वापरू नये तसेच परीक्षेच्या गोपनीयतेची आणि सुरक्षिततेची काळजी घेण्याबाबत स्पष्ट करण्यात आले आहे. परीक्षेत पुरवणी पद्धत बंद करतानाच उत्तरपत्रिकांतील पाने वाढवून २४ आणि ३६ करण्यात आली आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांची गैरसोय होणार नाही, त्यांना लेखनासाठी पुरेशी पाने उपलब्ध होतील, असे देखील परीक्षा आणि मूल्यमापन मंडळाच्या वतीने स्पष्ट करण्यात आले.

आजपासून विद्यापीठाच्या परीक्षा सुरू होत आहेत. काही अपवाद वगळता तिन्ही जिल्ह्यांत प्रत्येक महाविद्यालयात परीक्षा केंद्र आहे. या वर्षापासून पुरवणीशिवाय परीक्षा घेण्यात येणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना नेमकेपणाने उत्तरे लिहावी लागणार आहेत. त्याचबरोबर सुप्रीम कोर्टाच्या नियमानुसार उजव्या बाजूला विद्यार्थ्यांना समास आखता येणार नाही. लोकसभा मतदानाच्या दिवसाच्या अलिकडे आणि पलिकडे पेपर ठेवण्यात आलेले नाहीत. अशा प्रकारे परीक्षा पार पाडण्यासाठी विद्यापीठाने जय्यत तयारी केली आहे.

– डॉ. महेश काकडे, संचालक, परीक्षा आणि मूल्यमापन मंडळ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

'भारत गौरव' रेल्वे देवभूमीकडे थाटात रवाना; पुणे रेल्वे स्थानकावर पर्यटकांचे जंगी स्वागत

पुणे । प्रतिनिधी

देवभूमी अर्थात उत्तराखंडकडे निघालेल्या पर्यटकांचे सोमवारी सायंकाळी ढोल-ताशांचा गजर, लेझीमचा ताल, अशा पारंपरिक पद्धतीने पुणे रेल्वे स्थानकावर स्वागत करण्यात आले. त्यानंतर फुग्यांनी सजविलेली वातानुकूलित 'भारत गौरव' ट्रेन (मानसखंड एक्स्प्रेस) उत्तराखंडच्या दिशेने दिमाखात रवाना झाली.

उत्तराखंड सरकारचा टुरिझम विभाग आणि इंडियन रेल्वे, केटरिंग अँड टुरिझम कॉर्पोरेशन (आयआरसीटीसी) यांच्या संयुक्त विद्यमाने 'देखो अपना देश' या संकल्पनेअंतर्गत चालविण्यात येणार्या पर्यटन ट्रेनमधून पुण्यातील २८० पर्यटक देवभूमीत पर्यटनाचा आनंद लुटण्यासाठी मानसखंड एक्स्प्रेसने जात आहेत. या सर्व पर्यटक प्रवाशांचे पुणे रेल्वे स्थानकावर लाल गालिचा अंथरून जंगी स्वागत करण्यात आले.

रेल्वेगाडीतील पर्यटक प्रवाशांच्या हस्ते फीत कापल्यानंतर सोमवारी सायंकाळी रेल्वे रवाना झाली. या वेळी उत्तराखंड सरकारच्या टुरिझम विभागाचे सेक्रेटरी सचिन सुर्वे, आयआरसीटीसीच्या टुरिझम अँड मार्केटिंग विभागाचे डायरेक्टर राहुल हिमालयीन व अन्य अधिकारी आणि कर्मचारीवर्ग उपस्थित होता.

मानसखंड एक्स्प्रेस पुण्यातून उत्तराखंडात जाणारी पहिली 'भारत गौरव'ची रेल्वे आहे. उत्तराखंडच्या कुमाऊ विभागातील पर्यटनस्थळांना प्रोत्साहन देण्यासाठी मानसखंड एक्स्प्रेस नावाची ही विशेष पर्यटक ट्रेन सुरू करण्यात आली आहे. ही ट्रेन दि. २४ एप्रिल २०२४ रोजी उत्तराखंडमधील टनकपूर रेल्वे स्थानकावर पोहचेल. त्यानंतर उत्तराखंडमध्येच या १० रात्री व ११ दिवसांच्या सहलीमध्ये नैनिताल, भीमताल, अल्मोरा, चौकोरी, पूर्णागिरी मंदिर, हातकालिका मंदिर, कातरमाळ, कैंचीधाम, चिताई गोलू देवता, जागेश्वर, शारदाघाट, पाताल भुवनेश्वर मंदिर, नानकमत्ता गुरुद्वारा, चंपावत आदी ठिकाणे पर्यटकांना पाहायला मिळणार आहेत.